रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ७७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

आंबा-काजू उत्पादकांना एआय तंत्रज्ञानाची जोड/२
नागोठणेकरांना आता मिळणार शुद्ध पाणी/५
भारतीय संघाने आशियावर फडकवला झेंडा/८

## महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू



**मुंबई :** उत्तर भारतातील उर्वरित भाग, संपूर्ण गुजरात, मध्य प्रदेश तसेच बिहार, झारखंड, छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या काही भागांतून नैऋत्य मान्सूनने माघार घेतली असून परतीचा प्रवास सुरु झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्राच्या आणखी काही भागांतून मान्सून माघारीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार ३ ते ५ ऑक्टोबरदरम्यान कोकण-गोव्यात उष्ण व दमट हवामान राहील, तर ६ ते ९ ऑक्टोबरदरम्यान कोकण, गोवा व मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. छत्तीसगडमध्ये ६-७ ऑक्टोबरला वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. यंदा कोकण-गोव्यात सरासरी २८७०.८ मिमीऐवजी २४८०.१ मिमी पाऊस झाला असून १४ टक्के तूट नोंदवली गेली आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शरदरत्न जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## मुंबईत ७ ऑक्टोबरला सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवेला प्राधान्य देत अविरतपणे कार्यरत असलेले रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्रतर्फे प्रतिष्ठेचा 'शरदरत्न जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिरात बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री व विद्यमान खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

या सोहळयास संस्थेच्या आधारस्तंभ प्रतिभाताई पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, राज्याचे माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, रोहयो, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, खासदार सुप्रिया सुळे, अभिनेता व समाजसेवक



नाना पाटेकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, सुरेश म्हात्रे, आमदार रोहित पवार, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे, तर अन्य गौरवमूर्तींना वेगवेगळे पुरस्कार देण्यात येतील. दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत पुरस्कार वितरण आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक भावनेतून कार्य करीत असतात. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांचा सेवाभावी वारसा ते आजतागायत जपत आहेत. रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या शाळा-महाविद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे तसेच विधायक उपक्रमांना ते पाठबळ देत असतात. अशा या दानशूर व्यक्तिमत्त्वाला जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजारामबुवा शेलार आणि सहकाऱ्यांनी केले आहे.

# महायुतीचे जागावाटप निश्चित

## विधान परिषद पुणे शिक्षक मतदारसंघ भाजपकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटप निश्चित झाले आहे. प्रतिष्ठेच्या पुणे शिक्षक मतदारसंघावर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या चर्चेनंतर ही जागा भाजपच्या वाट्याला गेली आहे. त्यामुळे पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचा उमेदवार निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महायुतीतील जागावाटपानुसार पुणे शिक्षक, पुणे पदवीधर आणि नागपूर पदवीधर या तीन जागा भाजपकडे राहणार आहेत. अमरावती शिक्षक मतदारसंघ शिवसेना (शिंदे गट), तर छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) लढवणार आहे. पुणे शिक्षक मतदारसंघ भाजपच्या वाट्याला येताच पक्षातील उमेदवारीच्या हालचालींना वेग आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेऊन तीन मतदारसंघांसाठी संभाव्य उमेदवारांची यादी सादर केल्याची माहिती आहे.



भाजपने प्रत्येक मतदारसंघासाठी पाच संभाव्य उमेदवारांची नावे दिली असून तीन जागांसाठी एकूण १५ नावांचा समावेश आहे. केंद्रीय नेतृत्वाकडून या नावांवर चर्चा करून अंतिम उमेदवार निश्चित केला जाणार आहे.

**२३ ऑक्टोबरला होणार मतदान**

दरम्यान, विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक जागांच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विभाग पदवीधर मतदारसंघ आणि पुणे विभाग शिक्षक तसेच अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ अशा एकूण पाच जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या सर्व जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ६ ऑक्टोबर आहे. येत्या २३ ऑक्टोबरला या जागांसाठी मतदान होणार आहे, तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

**मविआत जागांवरून तिढा कायम**

विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसने आपल्या तीन उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. काँग्रेसने परस्पर तीन उमेदवारांची नावे जाहीर केल्याने महाविकास आघाडीतील इतर पक्षांची नाराजी दिसून आली. मित्रपक्षांना विचारात न घेता नावे जाहीर केलीच कशी, असा सवाल मित्रपक्षांनी उपस्थित केला. शनिवारी महाविकास आघाडीची हयात हॉटेल येथे बैठक झाली. या बैठकीत पाच जागांच्या अनुषंगाने चर्चा पार पडली. बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून खासदार संजय राऊत उपस्थित होते, मात्र महाविकास आघाडीच्या बैठकीत तोडगा निघाला नसल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीची रविवारी पुन्हा चर्चेची फेरी पार पडणार आहे.

## बोलीभाषेतील साहित्य हेच मराठीचे वैभव : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रत्येक बोलीभाषेत निर्माण होणारे साहित्य, साहित्य संमेलने आणि साहित्यिकांच्या कल्पना हेच मराठीचे मोठे वैभव असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अभिजात मराठी भाषा सन्मान दिवसनिमित्त अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६ च्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. मराठी भाषा ज्ञानाची भाषा होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानात तिचा वापर वाढवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठीला मोठा इतिहास आणि समृद्ध संस्कृती असली तरी राजमान्यता मिळणेही तितकेच महत्त्वाचे होते, असे नमूद करत महाराष्ट्र शासनाने विविध पुराव्यांच्या आधारे केंद्राकडे सातत्याने मागणी केल्याचे फडणवीस यांनी सांगितले. २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला, हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे ते म्हणाले. मराठी भाषा शाहीर, लोककलावंत आणि भक्तीपरंपरेतून समृद्ध झाली आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकारामांच्या अभंगांनी मराठीचे महत्त्व पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासोबत स्वभाषेचा गौरव केला. संपूर्ण राज्यकारभार मराठीत चालावा यासाठी प्रयत्न केले आणि मराठी राजभाषा कोश निर्माण केला.

महात्मा फुले, आगरकर, गोखले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठीतून परिवर्तनाचे विचार रुजवले. मराठीत विचार, ज्ञान, संघर्ष, परिवर्तन, अभिमान आणि स्वाभिमान असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मराठी ज्ञानकोश आणि शब्दकोशांमध्ये ११ ते १३ लाख शब्द आढळतात, तर ऑक्सफर्ड डिक्शनरीत सुमारे ६ लाख आणि मंडारिन, स्पॅनिश, फ्रेंचमध्ये तीन ते साडेतीन लाख शब्द आहेत. शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द असून १३ लाख शब्दांपर्यंत पोहोचण्याचे काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

भाषा ही केवळ संपर्काचे माध्यम नसून संस्कृतीची वाहक आणि इतिहासाची साक्ष आहे. भाषा संपली तर संस्कृती, विचार आणि व्यवस्था संपण्याचा धोका असतो. भाषा जिवंत ठेवण्यासाठी वापर, वावर आणि संशोधन या तीन गोष्टी महत्त्वाच्या असून त्यासाठी अभिजात दर्जा उपयुक्त ठरल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## निवडक

### हॉर्मुझच्या आखातात टँकरवर हल्ला; पाच भारतीयांची सुटका

**नवी दिल्ली :** हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत कुवेतचा ध्वज असलेल्या एमटी काझिमाह ३ या तेल टँकरवर प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला झाला. हल्ल्यानंतर टँकरवरील पाच भारतीय नागरिकांची सुखरूप सुटका करून त्यांना किनाऱ्यावर हलवण्यात आले.

### हॉकीमध्ये भारताच्या पुरुष संघाचेही ऐतिहासिक सुवर्ण यश

**मुंबई :** आशियाई क्रीडा २०२६मध्ये भारतीय पुरुष हॉकी संघाने शनिवारी सुवर्णपदक जिंकले. सलग दुसऱ्यांदा व एकूण पाचव्यांदा सुवर्ण जिंकत संघाने २०२८ ऑलिम्पिकची पात्रता निश्चित केली. एक दिवस आधी शुक्रवारी भारतीय महिला हॉकी संघानेही सुवर्णपदकाची कमाई केली होती.

## सीजेपीने आंबेडकरी जनतेची माफी मागावी : आमदार दरेकर

**मुंबई : प्रतिनिधी**



सीजेपीच्या आंदोलनात चुकीची माहिती देत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा घोर अपमान करण्यात आला. त्यामुळे आंबेडकरी जनतेत आणि राज्यात तीव्र असंतोष निर्माण झाला असून सीजेपीने माफी मागावी, अशी मागणी भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी शनिवारी (दि. ३) येथे केली.

सीजेपीचे आंदोलन सपशेल अयशस्वी ठरले. मुंबईकरांनी प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले तसेच चोख हाताळणीबद्दल मुंबई पोलिसांचे अभिनंदन केले. हे आंदोलन काँग्रेसच्या स्क्रिप्टवर झाले असून दीपके हा काँग्रेसचा चेहरा आहे. मोर्चात डाव्या विचारसरणीचे लोक दिसले, असे निरीक्षणदेखील त्यांनी यावेळी नोंदवले आहे. भाजपचा द्वेष आणि काँग्रेसचे मोठेपण सांगण्यासाठी खरंतर हे आंदोलन होते. विरोधकांकडे जनाधार नसल्याने वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न होत आहे. सीजेपी काँग्रेसची 'बी टीम' म्हणून काम करीत असल्याचा आरोपदेखील त्यांनी यावेळी केला. निवडणूक आयोगावर विश्वास नसेल तर आदित्य ठाकरे आणि महेश सावंत यांनी आधी आमदारकीचे राजीनामे द्यावेत, असे आव्हानही दरेकरांनी यावेळी दिले.

## भूमिपुत्र रिक्षा चालक-मालक संस्थेचा कळंबोलीत नवीन थांबा

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील वाहतूक पोलीस चौकीसमोर भूमिपुत्र रिक्षा चालक-मालक संस्थेचा नवीन रिक्षा थांबा नव्याने सुरू करण्यात आला आहे. या नवीन थांब्याचे भव्य उद्घाटन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ३) उत्साहात पार पडले. उद्घाटन सोहळ्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, सर्व रिक्षाचालकांनी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करीत काम केले पाहिजे तसेच कोणतीही समस्या उद्भवल्यास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढावा, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. भूमिपुत्र रिक्षा चालक-मालक संस्थेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या पुढाकारातून



आणि माध्यमातून कळंबोली वाहतूक पोलीस चौकीसमोर हा थांबा सुरू करण्यात आला आहे. यावेळी महापालिकेचे महापौर नितीन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, कामगार नेते रवी नाईक, (पान २ वर..)

## रौप्य महोत्सवी दिवाळी अंक स्पर्धेचे मंगळवारी पारितोषिक वितरण

### मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होणार विजेत्यांचा सन्मान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला गेली २५ वर्षे प्रोत्साहन देणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेने यंदा रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित २५व्या दिवाळी अंक स्पर्धेचा भव्य पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी (दि. ६) सायंकाळी ४ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. राज्याचे माहिती व तंत्रज्ञान तसेच सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या रौप्य महोत्सवी सोहळ्यास ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. गेल्या २५ वर्षांमध्ये या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यभरातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देतानाच लेखक, साहित्यिक, संपादक आणि विविध कलावंतांच्या सर्जनशीलतेचा गौरव करण्यात आला आहे. रौप्य महोत्सवी वर्ष हा या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असून यानिमित्ताने यंदाच्या स्पर्धेतील विजेत्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेत्या अंकाला एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक, द्वितीय क्रमांकाला ५० हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या अंकाला ३० हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. तसेच विविध साहित्यिक व कलात्मक विभागांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दिवाळी अंकांसह लेखकांचाही गौरव करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेत्यांना ४० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक, २० हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक आणि १० हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विविध साहित्यिक व कलात्मक विभागांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अंकांचा आणि लेखकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने होत असलेला पारितोषिक वितरण सोहळा दिवाळी अंकांच्या २५ वर्षांच्या साहित्यिक प्रवासाचा गौरव ठरणार आहे. मराठी साहित्य, कला, संस्कृती आणि वैचारिक परंपरेला समृद्ध करणाऱ्या दिवाळी अंकांच्या योगदानाचा सन्मान सोहळ्यात (पान २ वर..)



# आंबा-काजू उत्पादकांना एआय तंत्रज्ञानाची जोड

## शेती क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणणारा प्रकल्प - पालकमंत्री नितेश राणे

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

बदलत्या हवामानामुळे गेल्या दीड-दोन वर्षांत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा आणि काजू फळपिकांवर परिणाम झाला आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शाश्वत शेती करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. याच उद्देशाने आंबा-काजू उत्पादकांसाठी **एआय** आधारित 'स्मार्ट शेती' प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात येत असून, हा उपक्रम सिंधुदुर्गच्या शेती क्षेत्रात तंत्रज्ञानाची क्रांती घडवून आणणारा ठरेल, असा विश्वास पालकमंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.



जिल्हाधिकारी कार्यालयात **एआय** आधारित 'स्मार्ट शेती' प्रायोगिक प्रकल्पाचा शुभारंभ पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आला. सिंधुरत्न समृद्ध योजनेंतर्गत कृषी विभागामार्फत कृषी विज्ञान केंद्र, एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या माध्यमातून हा दोन वर्षांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये २०० आंबा उत्पादक आणि २०० काजू उत्पादक, अशा एकूण ४०० शेतकऱ्यांचा या प्रकल्पात समावेश करण्यात येणार आहे.

पालकमंत्री नितेश राणे म्हणाले, हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी कृषी विद्यापीठ आणि शासन स्तरावर विविध शाश्वत उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचबरोबर **एआय** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीसमोरील आव्हानांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. जगातील अनेक देश शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करीत आहेत. सिंधुदुर्गातील शेतकरीही तंत्रज्ञानाच्या बाबतीत कुठेही मागे राहणार नाहीत, यासाठी जिल्ह्यातील शेतीला तंत्रज्ञानाची जोड देण्यात येत आहे.

शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा आहे. येणाऱ्या पिढीला शेतीकडे आकर्षित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि **एआय** चा वापर कसा करता येईल, याचाही विचार करणे आवश्यक आहे. जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ४.५० लाख रुपयांचा टप्पा पार करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हा उपक्रम पारदर्शकपणे राबविला जाईल. शेती क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या शुभारंभप्रसंगी एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामतीचे शास्त्रज्ञ विवेक भोईटे यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, तंत्रज्ञानाच्या मदतीने जगभरातील कोणत्याही ठिकाणची शेती व्यवस्थापित करणे शक्य होत आहे. उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि सनियंत्रणाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी **एआय** तंत्रज्ञानाचा उपयोग होत आहे. ऊस उत्पादनामध्ये या तंत्रज्ञानाचा चांगला फायदा झाला असून, त्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

आंबा आणि काजू पिकांशी संबंधित विविध प्रकारची माहिती एकत्रित करून **एआय** प्रणालीच्या माध्यमातून तिचे विश्लेषण करण्यात येणार आहे. त्याआधारे पिकांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना व मार्गदर्शन शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाईल.

या माध्यमातून उत्पादनात वाढ साध्य करण्याचे उद्दिष्ट असून, कृषक मोबाईल प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मराठी भाषेत सहज समजेल अशा पद्धतीने आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या प्रकल्पांतर्गत स्थानिक हवामान केंद्रे, मृदा सेन्सर्स, IoT तंत्रज्ञान, उपग्रह छायाचित्रे, **एआय** आधारित पीक निरीक्षण व डिजिटल मॅपिंग यांचा वापर केला जाणार आहे. तसेच प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे डिजिटल वॉर रूम स्थापन करण्यात येणार असून, जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात डिजिटल डॅशबोर्डची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी यांनी हा प्रकल्प जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण आणि शेतकऱ्यांना लाभदायी ठरणारा उपक्रम असल्याचे सांगितले. प्रास्ताविक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री नाईकनवरे यांनी केले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अपूर्वा बासूर, अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी आरती देसाई, उपजिल्हाधिकारी प्रतिभा वराळे यांच्यासह जिल्ह्यातील विविध अशासकीय संस्था, प्रगतिशील शेतकरी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

भाजपातर्फे अभिजीत दिपकेंचा जाहीर निषेध

# 'भारतीयांना मतदानाचा अधिकार केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच!'

**महाड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने शनिवारी महाडच्या ऐतिहासिक चवदार तळे येथे कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख नेते अभिजीत दिपके यांच्या अलीकडील वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात आला. भारतीयांना मतदानाचा अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दिला, अशा आशयाचे वक्तव्य दिपके यांनी शिवाजी पार्क येथील आंदोलनादरम्यान केल्याचे वृत्त नुकतेच सर्वत्र प्रसिद्ध झाले होते. यावर भाजपा सर्व काही आंबेडकरी संघटनाने देखील निषेध नोंदविला होता. याच पार्श्वभूमीवर महाडमध्ये देखील भाजपातर्फे हे निषेध आंदोलन छेडण्यात आले.



भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार भारतीय संविधानामुळे मिळाला असून, संविधाननिर्मितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे, अशी भूमिका भाजपच्या वतीने मांडण्यात आली. मतदानाचा अधिकार आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार संविधानामुळे मिळाले आहेत. त्यामुळे संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाबाबत चुकीची माहिती देऊन इतिहासाची चुकीची मांडणी करू नये, अशी भूमिका भाजपच्या वतीने या आंदोलनातून मांडण्यात आली. आंदोलनाच्या सुरुवातीला भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी चवदार तळे परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा जयघोष करण्यात आला.

अभिजीत दिपके यांच्या प्रतिमा हातात घेऊन कार्यकर्त्यांनी त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध केला. यावेळी भाजपचे बिपिन म्हामुणकर, मंजुषा कुद्रीमोती, निलेश देवगिरकर, विकास दरेकर, योगेश झांजे, सुमित पवार, सूरज बामणे, सुनील सोंडकर, अनिल मोरे, चंद्रजीत पालांडे, प्रवीण महाडिक, आशा चोरट, प्राजक्ता दळवी, योगेश चव्हाण, कौशिक पोरे, स्वप्निल ठोंबरे, समृद्धी खोडके, प्रिया खोडके, रुपेश घाडगे, नागेश महाडिक, विशाल वांद्रे, गणेश फिलसे, स्नेहल म्हामुणकर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

> **"भारतीयांना मतदानाचा अधिकार पंडित जवाहरलाल नेहरू किंवा इतर कोणाच्या नावावर देता येणार नाही. हा अधिकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक भारतीयाला मिळाला आहे. बाबासाहेबांच्या योगदानाचे श्रेय दुसऱ्यांना देणे आणि इतिहासाची चुकीची मांडणी करणे आम्हाला मान्य नाही. अभिजीत दिपके यांच्या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो."**
>
> **-बिपिन म्हामुणकर, महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य तथा महाड १९४ विधानसभा प्रमुख,भाजपा.**

# डॉ. प्रकाश आमटे यांची कोतवालवाडी ट्रस्ट येथे भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक महाराष्ट्र भूषण डॉ. प्रकाश आमटे यांनी आज नेरळ येथे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या कोतवाल वाडी ट्रस्टला भेट दिली.ट्रस्टच्या कार्याची माहिती घेतल्यानंतर या ट्रस्टचे कौतुक डॉ प्रकाश आमटे यांनी केले.

नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्ट स्वतंत्रपूर्व काळात स्वातंत्रसैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी स्थापन केली. गेली ८० वर्षे हा संस्थेचे कार्य सुरू असून या कार्याची माहिती घेण्यासाठी धावती भेट ज्येष्ठ समाजसेवक महाराष्ट्र भूषण डॉ. प्रकाश आमटे यांनी भेट दिली.



यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी मंदाकिनी आमटे या उपस्थित होत्या. यावेळी कोतवाल वाडी ट्रस्टच्या अध्यक्षा संध्या देवस्थळे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त शेखर भडसावळे, बाळकृष्ण पादीर, डॉ. नेहरकर आदी उपस्थित होते. संस्थेच्या कार्याची माहिती घेतल्यावर आमटे दांपत्याने त्यांचे कौतुक केले.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता उपक्रमातून नवी मुंबईत जागरूकता

**नवी मुंबई : बातमीदार**

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत शासनाने सूचित केलेल्या विविध उपक्रमांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रभावी अंमलबजावणी सुरू असून यामधील 'सेवा योगदान' या उपक्रमांतर्गत 'ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता' हा अभिनव उपक्रम ज्येष्ठांच्या उत्साही गर्दीत राबविण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विष्णुदास भावे नाट्यगृहात संपन्न झालेल्या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या विशेष कार्यक्रमात 'ज्येष्ठ नागरिकांची सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता' या विषयावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे देत ज्येष्ठ नागरिकांनी हाऊसफुल्ल भरलेल्या प्रेक्षागृहात दिलखुलास संवाद साधत डिजिटल माध्यमांविषयी जनजागृती केली. त्यांच्यासमवेत अंमलदार अमोल कर्डिले उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे ज्येष्ठ नागरिक अनेकदा सायबर गुन्हेगारांचे सोपे लक्ष्य बनतात असे सांगत काळाची पावले ओळखून आता मुला-नातवंडाच्या मदतीने ज्येष्ठांनी स्वतःहूनच डिजिटल साक्षर होण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्याकरिता स्मार्टफोन, टॅब्लेट किंवा कॉम्प्युटर वापरण्याची सर्वसाधारण माहिती असणे तसेच सुरक्षित आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने ऑनलाईन बँकिंग, यूपीआय आणि ई-वॉलेटचा वापर सुरक्षितपणे कसा करावा याचीही माहिती करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे व्हॉट्सअॅप, फेसबुक यांसारख्या माध्यमांवर कोणती माहिती शेअर करावी आणि कोणती टाळावी, इंटरनेटवर किंवा व्हॉट्सअॅपवर येणारे सर्वच संदेश खरे नसतात. त्यामुळे कोणत्याही अफवांवर किंवा फॉरवर्ड केलेल्या मेसेजवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची पडताळणी करण्याची मानसिकता ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी घडलेली अनेक उदाहरणे सांगत पटवून दिले.

यादृष्टीने सायबर सुरक्षितता बाळगण्याची आवश्यकता असून आपले बँक खाते, ईमेल आणि सोशल मीडियासाठी समजण्यास कठीण असा पासवर्ड ठेवणे आणि तो कोणासोबतही शेअर न करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. बँकेचे अधिकारी किंवा इतर कोणीही फोनवर ओटीपी , यूपीआय पिन किंवा एटीएम कार्डचा नंबर मागितल्यास तो कधीही देऊ नये अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.

याशिवाय "तुम्हाला लॉटरी लागली आहे" किंवा "तुमचे वीज बिल भरले नाही म्हणून कनेक्शन कट होईल" अशा प्रकारच्या खोट्या मेसेजमधील अज्ञात लिंक्सवर क्लिक करणे टाळावे त्याचप्रमाणे केवायसी अपडेट करण्याच्या नावाखाली येणाऱ्या फसव्या फोन कॉल्सना बळी पडू नये हे त्यांनी आवर्जून सांगितले. बँक कधीही फोनवर वैयक्तिक माहिती मागत नाही, हे लक्षात ठेवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. त्याचप्रमाणे मोबाईलमध्ये स्क्रीन शेअरिंग अॅप्स अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून डाऊनलोड करू नयेत, यामुळे मोबाईलचा ताबा सायबर गुन्हेगारांकडे जाऊ शकतो अशी धोक्याची सूचना देत घरातील तरुण सदस्यांनी ज्येष्ठ नागरिकांना तंत्रज्ञान शिकवण्यासाठी वेळ देणेही तितकेच गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## 'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास' आता ऑनलाइन ;एसटीचा प्रवास अधिक सुलभ

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या 'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास' योजनेतील पास आता ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रवाशांना आगारात जाऊन हस्तलिखित पद्धतीने पास काढण्याची आवश्यकता राहणार नसून, घरबसल्या ऑनलाइन पास मिळवता येणार आहे.

पान १ वरुन

## कळंबोलीत भूमिपुत्र रिक्षा चालक-मालक संस्थेचा नवीन थांबा

भूमिपुत्र रिक्षा चालक-मालक संस्थेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, उपाध्यक्ष प्रल्हाद पावशे, सल्लागार सुजित भगत, सुरेश भोईर, नगरसेविका दमयंती भोईर, कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेशकुमार सरतोप, सुभाष पुजारी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, नागरिक आणि रिक्षाचालक उपस्थित होते.

## रौप्य महोत्सवी दिवाळी अंक स्पर्धेचे मंगळवारी पारितोषिक वितरण

करण्यात येणार असल्याने साहित्यप्रेमी, लेखक, पत्रकार, संपादक आणि दिवाळी अंक रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव नगरसेवक परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी केले आहे.

## मोहोपाड्यात महिलांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील श्री गणेश युवक मित्र मंडळाच्या साखरचौथ गणेशोत्सवाचे यंदा २१ वे वर्ष असून, गणरायाच्या साक्षीने विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. दरवर्षी मंडळाकडून करण्यात येणाऱ्या आकर्षक सजावटीसह विविध उपक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता महिलांसाठी संगीत खुर्ची, सॉस गेम, तळ्यात-मळ्यात, गायन तसेच विविध मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .यात मोहोपाडा गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

मोहोपाडा येथील बी. बी. बांठिया यांच्यावतीने विजेत्या महिलांना पैठणी साडी तसेच चांदीची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले.यानंतर बी. बी. बांठिया यांच्या वतीने किशोरी गलबले, सुप्रिया पाटील आणि पुषा कटीमिन यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गायकर यांनी केले.

महिलांना आपल्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सुप्त कौशल्यांना व्यासपीठ मिळावे आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वाढावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिर परिसरातील महिलावर्गाने विशेष मेहनत घेतली.

# आश्रमशाळेमध्ये राबवले स्वच्छता अभियान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

२ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत "स्वच्छ सुंदर व निरोगी आश्रमशाळा अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभंगांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण मधील कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन संचालित श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा वाकडी (शांतिवन) आश्रमशाळेमध्ये स्वच्छता अभियान सुरू केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती पाटील, वैशाली पाटील, अधीक्षक-अधिक्षिका, समस्त शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांच्या योगदानातून शाळा परिसर स्वच्छता व नजीकच्या वाकडी आदिवासी वाडीमध्ये स्वच्छता रॅली काढण्यात आली. तसेच म.गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी शाळा -वसतीगृह स्वच्छता करून भाषण, चित्रकला, नृत्य व पथनाट्य असे विविध कार्यक्रम राबविले. वाकडी गावच्या सरपंच कुंदाताई पवार यांचे देखील सहकार्य लाभले.



**दुखवटा**

## स्नेहा गुप्ते

**पनवेल :** कै. प्रदीप गुप्ते यांच्या पत्नी तथा जवाहर को.ऑप इंडस्ट्रीयल इस्टेस्टचे अध्यक्ष स्वप्नील प्रदीप गुप्ते यांच्या मातोश्री श्रीमती स्नेहा गुप्ते यांचे अल्पशा आजाराने दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी निधन झाले.त्यांच्यावर पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.गुप्ते कुटुंबीयांवर कोसळलेल्या या दुःखद प्रसंगी नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



## कमळाबेन दोशी



**माणगाव :** तालुक्यातील गोरेगाव शिवसेनेचे विभाग प्रमुख जगदीश दोशी यांच्या मोतोश्री कै.कमळाबेन भगवान दोशी यांचे शुक्रवार दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या राहते घरी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय - ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार बहिणी,एक मुलगा,जावई, सुन ,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.११ ऑक्टोबर रोजी तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि.१३ ऑक्टोबर २०२६ रोजी राहते घरी जुनी बाजारपेठ गोरेगाव ता.माणगाव येथे होणार आहे.

# सीकेटी विद्यालयात राष्ट्रनायकांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंती चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने झाली .

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन विदयालयाचे आदरणीय मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व विद्यालयाचे पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांनी केले.इयत्ता आठवीतील विद्यार्थी चि. यश राजेंद्र आढाव याने महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर भाषण करताना त्यांच्या विचारांचा उल्लेख केला.

तसेच गांधीजींच्या “करेंगे या मरेंगे” या प्रेरणादायी विचाराचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना देशप्रेम, धैर्य आणि कर्तव्याची जाणीव करून दिली.

यानंतर चि. मानव माणिक म्हात्रे याने आपल्या भाषणातून गांधीजींच्या प्रसिद्ध तीन माकडांच्या संदेशाचे महत्त्व सांगितले. वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका या संदेशाचा आजच्या विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संबंध जोडत त्याने सोशल मीडिया, अफवा, चुकीची माहिती आणि एकमेकांशी वागण्याबाबत विद्यार्थ्यांनी सजग राहण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांची तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व ‘जय जवान, जय किसान’ या संदेशाची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी गांधीजींचे विचार केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत,असाही संदेश या प्रसंगी देण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. स्वाती पाटील व सौ .राधिका शिर्के यांनी केले.सत्याचा मार्ग धरूया, अहिंसेचा विचार करूया, स्वच्छ आणि सुंदर भारत घडवूया! या संदेशासह सौ अश्विनी देशमुखे यांनी सूत्रसंचालन पार पाडले



पनवेल : शिवाजी नगरयेथील विश्वास नारायण ठाकुर आणि सारिका पाटील यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. या निमित्त त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



पनवेल :भाजपचे मालधक्का वसाहत प्रमुख अशोक आंबेकर यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



**नवीन पनवेल : महात्मा गांधी जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी नवीन पनवेल शहर मंडळाचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली महिला मोर्चा अध्यक्ष आशा मुंडे यांच्या वतीने “सेवा, स्वच्छता आपले योगदान” या भावनेतून स्वच्छता अभियान राबविण्याचे आले.यावेळी गोपीनाथ मुंडे, नवीन पनवेल शहर उपाध्यक्ष दिलीप कोरडे वाहतूक सेल अध्यक्ष सुरेश म्हात्रे,संजय पाटील, मधुरा भोसले महिला मोर्चा सरचिटणीस जयंती नाईक , उपाध्यक्ष अनिता रासकर ,उपाध्यक्ष स्नेहल सपकाळ, सदस्य शुभांगी रायते, खजिनदार उर्मिला प्रजापती गुडिया भारती, स्वाती नांगरे उपस्थित होते.**

# राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२६-२७

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे आमंत्रण रायगड जिल्हा कुस्ती संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी रायगडचे पालक मंत्री भरत गोगावले, यांना दिले.



ही स्पर्धा १० ऑक्टोबर २०२६ रोजी काशी स्पोर्टस सेंटर महाराजा हॉल , खोपोली, तालुका खालापूर येथे आयोजित करण्यात आली आहे . कुस्तीच्या माध्यमातून युवा खेळाडूंना प्रोत्साहन देत क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्याचा संकल्प असून राज्यभरातील युवा कुस्तीपटूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

यावेळी महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे,रायगड जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर , खासदार श्रीरंग बारणे , सुनिल तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर , महेश बालदी , रविंद्र पाटील , महेंद्र थोरवे , महेंद्र दळवी , खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे , हिंद केसरी योगेश दोडके , जिल्हाधिकारी किशन जावळे,पोलिस अधिक्षक आंचल दलाल , जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदि उपस्थित रहाणार आहेत .

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे १ ऑक्टोबर रोजी ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. ‘एक दिवस, एक तास, एक साथ’ या संकल्पनेनुसार गुरुवारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी विद्यालय आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ करत ‘स्वच्छ परिसर, सुंदर परिसर’ हा संदेश दिला. स्वच्छता ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.





विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान यशस्वीपणे पार पडले. या स्वच्छता अभियानासाठी खारघर प्रभाग समितीचे सभापती श्री. मधु पाटील, स्कूल समिती सदस्य प्रभाकर जोशी , प्राचार्या डॉ. निशा नायर तसेच महानगरपालिका सदस्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली.

# वन्यजीव सप्ताहाची उत्साहात सुरुवात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरर फाउंडेशन, स्नेक अवेअरनेस असोसिएशन, वन विभाग, पनवेल आणि खारघर-तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या वन्यजीव सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून ओवे हिल्स, हायडपार्क समोर स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. या मोहिमेत एसआयईएस कॉलेजच्या ६१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अधिवास जोडूया आणि वन्यजीवांचे संवर्धन करूया अशी या उपक्रमाची संकल्पना होती



यावेळी पनवेल वन विभागाचे सहायक वनरक्षक सागर माळी आणि वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन पानपाट्टे यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव, त्यांचे नैसर्गिक अधिवास, जैवविविधतेचे महत्त्व तसेच अधिवासाचे तुकडीकरण आणि जैवविविधतेचा होणारा ऱ्हास यामुळे वन्यजीवांवर होणाऱ्या परिणामांविषयी मार्गदर्शन केले. निसर्गात मानवांकडून टाकण्यात येणारा प्लास्टिक, काच, कचरा आणि इतर घातक वस्तू वन्यजीवांसाठी गंभीर धोका निर्माण करू शकतात. अनेक वेळा या वस्तूंमुळे वन्यजीवांना गंभीर दुखापत होते आणि काही प्रसंगी त्यांचा जीवही जाऊ शकतो. त्यामुळे निसर्ग स्वच्छ ठेवणे आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

ज्योती नाडकर्णी, स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरर फाउंडेशन, रघुनाथ जाधव मानद वन्यजीव रक्षक, रायगड तसेच वन विभागाच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली सहभागी सर्वजण पाच वेगवेगळ्या दिशांनी पसरले आणि डोंगर परिसराची स्वच्छता केली. या मोहिमेत तब्बल २० पोती कचरा गोळा करण्यात आला. ही तर वन्यजीव सप्ताहाची केवळ सुरुवात आहे. पुढील काही दिवसांत वन्यजीव आणि निसर्ग संवर्धनाशी संबंधित आणखी विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून आपल्या तरुण पिढीला निसर्गाने आपल्यासाठी जपून ठेवलेल्या या अमूल्य आणि सुंदर खजिन्याची जाणीव करून देणे, तसेच त्याच्या संवर्धनासाठी त्यांना प्रेरित करणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमाला सहकार्य करून तो यशस्वी करण्यासाठी वन विभाग, एसआयईएस कॉलेज आणि केटीसीडब्ल्यूएच्या सर्व सदस्यांचे आभार मानले.

# सिडकोकडून कामोठ्यात बांबूशेड जमीनदोस्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे उपनगरातील सिडकोच्या भूखंडांवर परवानगीशिवाय उभारण्यात आलेल्या पाच बांबूशेडवर सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाने गुरुवारी कारवाई केली. सेक्टर ३५, ३२ आणि १९ मधील या शेडचे जेसीबीच्या साहाय्याने पाडकाम करण्यात आले. पोलीस, सिडकोचे सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या सहकार्याने ही कारवाई करण्यात आली. सिडकोच्या भूखंडांवर अनधिकृत बांधकामे होऊ नयेत, यासाठी तक्रारींची दखल घेऊन कारवाई करण्यात आली.

कामोठे परिसरातील जागरूक नागरिकांनी सिडकोच्या भूखंडांवर बांबूशेड उभारून त्याठिकाणी व्यवसाय सुरू करण्याचे नियोजन असल्याच्या तक्रारी सिडकोकडे केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे आणि मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांनी अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाला कारवाईचे निर्देश दिले.

त्यानुसार सेक्टर ३५ मधील भूखंड क्रमांक ९७ आणि ९७ अ वरील अनुक्रमे सुमारे २८० आणि २४० चौ.मी. क्षेत्रफळाच्या दोन बांबूशेडचे पाडकाम करण्यात आले. सेक्टर १९ मधील भूखंड क्रमांक १३ वरील सुमारे ८०० चौ.मी. क्षेत्रफळाचे बांबूशेड, तसेच सेक्टर ३२ मधील भूखंड क्रमांक १ वरील सुमारे ५२५ आणि २०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या दोन बांबूशेडवरही कारवाई करण्यात आली.

सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून आणि सिडको महामंडळाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता ही बांबूशेड उभारण्यात आली होती.

# पनवेल तहसीलतर्फे फणसवाडी येथे आदिवासी बांधवांना गाव नमुना ७ ई चे वाटप

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता फणसवाडी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात स्थानिक आदिवासी बांधवांना प्रातिनिधिक स्वरूपात गाव नमुना ७ ई (७/१२) चे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक तसेच तहसीलदार पनवेल मिनल भामरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी कसळखंडचे सरपंच संजय घरत, उपसरपंच गिरीश पाटील, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, स्थानिक ग्रामस्थ अजित पाटील आणि कसळखंडचे पोलीस पाटील प्रविण पाटील हेदेखील उपस्थित होते.

अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये पळस्पे महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी शशिकांत सानप, कसळखंडचे तलाठी विनय पाटील, पळस्पेच्या तलाठी प्रिया वैती, कोळखेचे तलाठी अमित ताथवडे आणि विचुंबेचे तलाठी सचिन पवार यांचा समावेश होता. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते फणसवाडी येथील आदिवासी बांधवांना गाव नमुना ७ ई चे वाटप करण्यात आले. शासनाच्या या उपक्रमामुळे स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून उपस्थित नागरिकांनी महसूल प्रशासन व लोकप्रतिनिधींचे आभार मानले.




# रविवारी मध्य रेल्वेचा मेगाब्लॉक; पनवेल-वाशी हार्बर मार्गावरील सेवा रद्द

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडून विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी रविवारी, ४ ऑक्टोबरला मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. पनवेल-वाशी हार्बर मार्गासह मुख्य मार्गावरील सीएसएमटी-विक्रोरोळी दरम्यानच्या धीम्या मार्गावर पाच तासांचा ब्लॉक घेण्यात येणार असल्याने नवी मुंबईतील प्रवाशांना रेल्वे प्रवासाचे नियोजन करून घराबाहेर पडावे लागणार आहे.

पनवेल-वाशी दरम्यानच्या अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ४.०५ या वेळेत मेगाब्लॉक असेल. या कालावधीत पनवेलहून सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या हार्बर मार्गावरील सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ या वेळेतील सेवा रद्द करण्यात येणार आहेत. तसेच सीएसएमटीहून बेलापूर-पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ या वेळेतील लोकलही रद्द राहतील.

ट्रान्स-हार्बर मार्गावरही सेवांवर परिणाम होणार आहे. पनवेलहून ठाण्याकडे जाणाऱ्या सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ या वेळेतील, तर ठाण्याहून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० या वेळेतील सेवा रद्द करण्यात येणार आहेत. मात्र, ब्लॉकच्या कालावधीत ठाणे-वाशी/नेरूळ दरम्यान ट्रान्स-



हार्बर सेवा सुरू राहणार आहेत. प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी ब्लॉकच्या कालावधीत सीएसएमटी-मुंबई ते वाशी दरम्यान विशेष लोकल चालविण्यात येणार आहेत. तसेच पोर्ट मार्गावरील लोकल सेवा नियमित सुरू राहतील.

मुख्य मार्गावर सीएसएमटी-विखरोळी दरम्यानच्या अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.५५ ते दुपारी ३.५५ या वेळेत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात सीएसएमटीहून सुटणाऱ्या धीम्या लोकल जलद मार्गावर वळविण्यात येतील. या लोकलना भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला येथे थांबे देण्यात येतील. विखरोळी येथे त्या पुन्हा धीम्या मार्गावर वळविण्यात येतील.प्रवाशांनी त्यानुसार प्रवासाचे नियोजन करावे.

निमित्त जागतिक हास्य दिनाचे

# मराठी चित्रपटांनी खूप खूप हसवले...

खरंतर दररोज हसत हसत जगायला हवं. त्यामुळे मानसिक, भावनिक, शारीरिक व बौद्धिकदृष्ट्या आपण एकदम फिट राहतो, पण हे दररोज शक्य होईलच असे अजिबात नाही. म्हणूनच बहुधा २ ऑक्टोबर हा जागतिक हास्य दिवस म्हणून साजरा केला जातो. मराठी चित्रपटांनी, त्यातील अनेक कलाकारांनी, विनोदी व्यक्तीरेखांनी, धमाल प्रसंगांनी आपल्याला नेहमीच हसवलं आहे. त्यातीलच या काही विनोदी गोष्टी.

विष्णुपंत जोग आणि दामुअण्णा मालवणकर ही मराठी चित्रपटातील एक विनोदवीरांची जोडी. हंस चित्र या निर्मिती संस्थेच्या मा. विनायक अभिनित व दिग्दर्शित "ब्रह्मचारी" (१९३८) या चित्रपटात ही जोडी सर्वप्रथम जमली. ब्रह्मचारी चित्रपटाने पुण्यात आर्यन चित्रपटगृहात रौप्य महोत्सवी यश संपादले. मुंबईत गिरगावातील मॅजेस्टिक सिनेमागृहात हा चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत चालला. मॅजेस्टिक सिनेमागृहात एक विशेष उल्लेखनीय गोष्ट, तिकीटाबरोबर सुकामेव्याची छोटी पाकिटे (त्या काळात मार्केटिंग हा शब्दप्रयोग रुळला नसला तरी हे करण्यात आले). ब्रह्मचर्य न पाळणाऱ्या आईबापाबद्दल कुठल्या मुलाला आदर वाटेल असे जन्मदात्यांना ठणकावून औदुंबर ( मा. विनायक) घर सोडतो आणि आचार्य चंडिरामच्या (दामुअण्णा मालवणकर) आश्रमात दाखल होतो अशा मध्यवर्ती कथासूत्रवरचा हा आचार्य अत्रे लिखित धमाल विनोदी चित्रपट. स्वतःसाठी आम्रयोग (आंबे खाणे) व इतरांसाठी "कष्टयोग हा चंडिरामचा बाणा (आणि जोडीला विष्णुपंत जोग).

दामूअण्णा मालवणकर आणि विष्णुपंत जोग ही जोडी अनेक चित्रपटांत जमली. असाच एक चित्रपट पार्श्वनाथ आळतेकर दिग्दर्शित आणि हंस चित्र निर्मित "सुखाचा शोध". त्यात दामूअण्णा मालवणकर "बाताराम" ही धमाल व्यक्तीरेखा साकारलीय. (याच चित्रपटावरुन काही वर्षातच या चित्रपटाचे कथा पटकथा व संवाद लेखक नावाची वि. स. खांडेकर यांनी कादंबरीही लिहिली.) हा बाताराम सतत थापा मारत असतो आणि त्यात त्याच्या मित्राची साथ मिळत राहते. या चित्रपटात विष्णुपंत जोग यांच्यावर एक होता राजा... असे धमाल विडंबन गीत आहे. एक विशेष गोष्ट म्हणजे या चित्रपटात बाबूराव पेंढारकर, मीनाक्षी शिरोडकर यांच्या भूमिका असूनही दामूअण्णा मालवणकर व विष्णुपंत जोग भाव खाऊन जातात असे म्हटले तर गेलेच. पण या चित्रपटाच्या टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रातील जाहिरातीत फक्त दामूअण्णा मालवणकर यांचाच फोटो होता. तर बाबूराव पेंढारकर यांनी मात्र व जोग या जोडीला उद्देशून एक पत्र लिहिले, तुम्ही पडद्यावर प्रेक्षकांसमोर आलात की सर्वांचे लक्ष तुमच्यावर केंद्रीत होते. आम्ही कितीही चांगले काम केले तरी ते वाया जाते.

बजेट हा मराठी सिनेमाचा नेहमीचाच विषय. अनेकदा तरी बजेटची गणितं न जुळल्यामुळे शूटिंग सुरू असलेले अनेक सिनेमे बंद पडल्याची सुद्धा काही उदाहरणं आहेत. एका विनोदी चित्रपटाने अशा अडचणींवर मात करत यश प्राप्त केले. या सिनेमाचं नाव 'आम्ही जातो आमच्या गावा'. या सिनेमाचं शुटिंग जवळपास चार वर्षे सुरू होतं. हा सिनेमा बनवायला इतकी वर्ष का लागली असा तुमचा प्रश्न असेलच. या सिनेमाची कथा मोठी गमतीशीर. तुरुंगातून पळालेले तीन कैदी एका सज्जन माणसाच्या घराचा आश्रय घेतात. सुरुवातीला त्यांचा उद्देश चोरी करण्याचा असतो. पण त्यानंतर या तीन कैद्यांमध्ये कसं परिवर्तन घडतं आणि त्या सज्जन माणसाच्या आयुष्यात असलेल्या अडचणी हे तीन कैदी कशा सोडवतात याची धमाल गोष्ट म्हणजे हा सिनेमा. निर्माते दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांच्या या हा सिनेमाचं शुटिंग १९६३ साली सुरु झालं होतं.

या काळात कमलाकर तोरणेंना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींना सामोरं जावं लागलं. यामुळे शूटिंग लांबत चाललं होतं. शूटिंग एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल पुढचे चार पाच वर्ष सुरू होतं. आणि या अवधीत या चित्रपटासाठीचे कपडे विटले होते. जुने झाले होते. या सिनेमात सूर्यकांत, श्रीकांत मोघे, मधू आपटे, उमा भेंडे असे कलाकार होते. या सर्व कलाकारांनी सुद्धा कोणतीही तक्रार न करता पार विटून गेलेले हे कपडे वापरून हा सिनेमा पूर्ण केला.

हा सिनेमा पूर्ण करण्यासाठी सिनेमाचे निर्माते दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांनी एका धनाढ्य व्यक्तीकडून दहा हजार रुपयांचं कर्ज काढलं. १९६८ सालाचा विचार केल्यास ही रक्कम निश्चितच काही लाखांची होती. अखेर ९ ऑगस्ट १९६८ रोजी हा




सिनेमा संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला. आणि आश्चर्य म्हणजे सिनेमा सुपरहिट झाला. आर्थिकदृष्ट्यासुद्धा सिनेमाने भरपूर कमाई केली.निर्माते दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांना भरपूर आनंद झाला. सिनेमा हिट झाल्याने त्यांना आर्थिक फायदासुद्धा झाला. पूर्वीच्या काळी सिनेमा हिट झाल्यावर कलाकारांना आठवण म्हणून ट्रॉफी दिल्या जायच्या. या ट्रॉफी लाकडाच्या किंवा पत्र्याच्या असायच्या. पण कमलाकर तोरणे यांनी आनंदाच्या भरात सर्व कलाकारांना चांदीच्या ट्रॉफी दिल्या. ज्या माणसाकडून त्यांनी दहा हजार रूपयांचं त्याचं कर्ज घेतलं होतं त्याचं कर्ज त्यांनी व्याजासकट परत केलं.

इतकंच नव्हे तर सिनेमाशी निगडीत सर्व कामगार आणि तंत्रज्ञांना त्यांनी दहा हजार रुपयांचा बोनस दिला. विनोदी चित्रपटाच्या यशात असे अडथळे, अशा अडचणी येत येत मार्ग काढत काढत यश प्राप्त केले. विनोदी चित्रपट हा मराठी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील एक हुकमी एक्का. ऐंशीच्या उत्तरार्धात सचिन पिळगावकर, महेश कोठारे, गिरीश घाणेकर, पुरुषोत्तम बेर्डे यांनी मराठीत विनोदी चित्रपटाचे सातत्य कायम ठेवले. 'धूम धडाका' हा महेश कोठारेचा निर्मित व दिग्दर्शित पहिला विनोदी चित्रपट. महेश कोठारेच्या कॉलेजवयीन काळात 'प्यार किए जा' हा श्रीधर दिग्दर्शित विनोदी हिंदी चित्रपट खूप चालला होता. त्यामुळेच याचा रिमेक करण्याचा निर्णय महेशने घेतला. अण्णासाहेब देऊळगावकर यांच्यामुळे हा चित्रपट होऊ शकला. त्यांनी लेखनात महेश कोठारेला खूप मदत केली. मेहमूद, शशी कपूर आणि किशोर कुमार, ओम प्रकाश यांचा हा गाजलेला चित्रपट. याचा रिमेक करताना महेश कोठारेच्या डोळ्यासमोर कास्टिंग निश्चित झाले होते. शशी कपूरच्या रोलसाठी महेश स्वतः, किशोर कुमार यांच्या रोलसाठी अशोक सराफ, ओमप्रकाश यांच्या रोलसाठी शरद तळवलकर आणि मेहमूदच्या रोलसाठी कुणाला कास्ट करायचे हा महेशसमोर मोठा प्रश्न होता. या रोलसाठी लक्ष्मीकांत बेर्डे मिळाला आणि मराठी चित्रपटसृष्टीला एक नवा सुपरस्टार.

धूम धडाकानंतर लक्ष्या आणि महेश कोठारे यांची चांगलीच जोडी जमली. त्यानंतर त्यांनी महेश कोठारेच्या दे दणादण, थरथराट, धडाकेबाज , खतरनाक इत्यादी चित्रपटातून दोघांनी खूप काम केले. एक वेगळंच बॉडिंग त्या दोघांत निर्माण झालं होतं. महेशच्या चित्रपटात लक्ष्मीकांत खुलून काम करायचा. हॉलिवूडमध्ये जशी डिन मार्टिन आणि जेरी लुईस यांची जोडी होती. तशी इथे महेश कोठारे आणि लक्ष्मीकांत बेर्डेची जोडी आहे, असं तेव्हा गमतीने म्हटले जायचं.



'ही दोस्ती तुटायची नाय' हे गाणं त्यातूनच जन्माला आलं होतं असे म्हटलं तरी चालेल.

महेश कोठारेच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील व्हिलनचे विचित्र नाव हा एक गमतीदार प्रकार होता. 'दे दणादण'मध्ये जो व्हिलन होता, त्याचे नाव ठेवले होते 'झगड्या रामोशी'. या नावांचे श्रेय अण्णासाहेब देऊळगावकर यांना जाते. त्यांनीच व्हिलनची नावे अँटिक ठेवण्याबाबत महेशला सांगितले. कवठे महांकाळ या गावाच्या नावावरुन महेशला 'कवट्या महाकाल' हे नाव सुचले. थ्रिलर चित्रपटातही कॉमेडी असते त्यामुळे 'टकलू हैवान' आणि त्याची टकली गँग साकारली. झपाटलेला चित्रपट महेशने सात दिवसांत लिहून पुर्ण केला होता. पण व्हिलनचे नाव काही सुचत नव्हते. हॉलिवूडमध्ये स्कॉर्पियन नाव प्रचलित होते. त्यावरुन महेशने मराठीत विंचू असे नामकरण केले. विंचूला बॅलन्स करण्यासाठी महेशच्या चित्रपटाच्या सेटवर एक काका होते. त्यांना सगळेच तात्या म्हणायचो. त्यामुळे चित्रपटाचा खलनायक व्हीलन 'तात्या विंचू' झाला.

अशोक सराफचा अभिनय क्षेत्रातील चौफेर दीर्घानुभव पाहता त्याचे एकाद्या विषयावरील त्याचे बोलणे अतिशय महत्वाचे हे ओघाने आलंच. अशोक सराफ म्हणतो, 'मी मुळात विनोदी नट नाही, तर ते ते विशिष्ट पात्र उभं करणारा कलाकार आहे. सुरुवातीला विनोदी भूमिका केल्या म्हणून तसा शिक्का माझ्यावर बसला. तो पुसून टाकायचा, म्हणून तिसऱ्याच चित्रपटात मी खलनायकाची भूमिका केली होती. 'अरे संसार संसार' या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारली. लोकांना अशा भूमिकाही आवडल्या. हिंदी चित्रपटसृष्टीच्या दृष्टीनं मराठी माणूस हा नायकाच्या संकल्पनेत बसतच नाही. मराठी कलाकार हिंदी चांगलं बोलू शकत नाहीत, असाही हिंदी चित्रपटसृष्टीत गैरसमज आहे. मला हिंदीत काही चांगल्या भूमिका मिळाल्या; पण अनेक फालतू भूमिकाही मिळाल्या. त्या मी वेळ होता म्हणून केल्या. हिंदी चित्रपटसृष्टीत मराठी कलाकारांना म्हणावी तशी किंमत नाही. रंगभूमीवरचे कलाकार असल्याची




जाणीव ठेवून मात्र ते मराठी कलाकारांना टरकून असतात.

राजकमल कलामंदिर (युवा विंग) निर्मित, निर्माते किरण शांताराम आणि दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांचा 'अशी ही बनवाबनवी' हा सर्वकालीन लोकप्रिय असा विनोदी चित्रपट. त्याच्याबद्दल किस्से सांगावेत तेवढे थोडेच. या चित्रपटातला आयकॉनिक डायलॉग 'हा माझा बायको' स्क्रिप्टचा भागच नव्हता. अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांची मैत्री खूप घट्ट होती. त्यामुळे ही माझी बायको म्हणण्याऐवजी अशोक सराफने 'हा माझा बायको' चुकून म्हटलं आणि तो हिट झाला.

हा चित्रपट १९६६ मध्ये आलेल्या हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'बीवी और मकान'चा रिमेक आहे. सचिन पिळगावकर आणि अशोक सराफ यांनी याआधीही एकत्र काम केलं होतं. पण सचिन आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांची एकत्र काम करण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे लक्ष्मीकांतला आपली भूमिका कमी होण्याची भीती होती. मात्र प्रदर्शनापूर्वी जेव्हा मुंबईत प्रेस शो झाला तेव्हा त्याने पाहिलं की इतरांना जेवढा स्क्रीन टाइम मिळाला आहे तेवढाच त्यांनाही मिळाला आहे. त्यानंतर सचिन आणि त्यांची मैत्री कायमची घट्ट झाली.

हा चित्रपट रंगमंचाचे महानायक बालगंधर्व यांना समर्पित होता. 'कुणीतरी येणार गं' या दृश्याच्या चित्रीकरणाच्या वेळी लक्ष्मीकांतला दिवसभर गरोदर बाईच्या गेटअप मध्ये राहावं लागलं. तेव्हा तो म्हणाला, महिलांना यातून जाण्यासाठी किती अडचणींचा सामना करावा लागतो हे आज मला जाणवलं. सचिन पिळगावकरने स्त्रीचं रूप घेऊन सेटवर अनेकांसोबत गंमत केली होती. त्याच्या या रुपाने अनेक जण फसले होते. त्यात चित्रपटाचे लेखक वसंत सबनीसदेखील होते. त्यांनी सचिन पिळगावकरला सुरुवातीस ओळखलेच नाही. जेव्हा लक्ष्मीकांत बेर्डेला कळलं की या चित्रपटात स्त्री भूमिकाही करायचीय तेव्हा तो निराश झाला. तेव्हा सचिन त्याला म्हणाला, मीसुद्धा स्त्री भूमिका करणार आहे. त्यावर लक्ष्मीकांत म्हणाला, मला कोण बघेल? सगळे तुलाच बघतील. त्यावर सचिन म्हणाला, लोक माझ्याकडे स्त्री म्हणून बघतील पण तू करत असलेलं पार्वतीचं पात्र ते जास्त एन्जॉय करतील आणि तसं झालंही.

दादा कोंडके अभिनित, निर्मित व दिग्दर्शित "तुमचं आमचं जमलं" या चित्रपटात दादा कोंडके व अशोक सराफ सख्खे भाऊ असतात. एक चांगला तो नायक




तर दुसरा वाईट म्हणजे खलनायक. हा खलनायक अशोक सराफने साकारला होता. सेटवर दादा व अशोक सराफ एकमेकांशी फारसं बोलत नसत असे खुद्द अशोक सराफ यांनीच या चित्रपटाची आठवण देताना एकदा सांगितले. अशोक सराफ यांच्या मते त्यांच्या भूमिकेचे वजन जास्त होते. सगळीकडे माकड घेऊन फिरायचे होते. याच माकडापासून चोऱ्या करुन घ्यायच्या. चोरी करण्याचे ट्रेनिंग हा खलनायकच देतो. आणि ते माकड खिडकीतून हात घालून चोरी करीत असे. त्या काळात असे प्रकार झालेही होते. चित्रपटात एकच माकड असले तरी शूटिंगसाठी तीन माकडे वापरली. पहिल्या दिवशी सेटवर माकड आणले तेव्हा अशोक सराफना धडकीच भरली. आपल्याला माकडासोबत काम करायचयं ही ठीक आहे. पण या माकडाला काही प्रशिक्षण दिले आहे ना अशी अशोक सराफ यांच्या मनात शंका होती. मराठीत तेवढं बजेटही नव्हतं. मदारी शिकवे तेवढेच तो करे. मदारी अशोक सराफना म्हणाला, असा हात पुढे करा ते माकड आपोआप तुमच्या हातावरुन तुमच्या खांद्यावर जावून बसेल.

माकडाने खरोखरंच तसे केल्यावर अशोक सराफ यांच्या मनातील भीती थोडी कमी झाली. तेव्हा पटकन अशोक सराफ म्हणाले, ए शाब्बास! हे ऐकताच त्या माकडाने अशोक सराफ यांच्या डोक्यावर एक सणसणीत टपली मारली. काही झालं तरी माकडाशी बोलायचे नाही असे ठरवूनच अशोक सराफ यांनी या चित्रपटात काम केले पण पहिली दोन माकडे तोपर्यंत पळून गेली.

दादा कोंडके नायक आणि अशोक सराफ खलनायक असे पांडू हवालदार, रामराम गंगाराम व तुमचं आमचं जमलं असे तीन चित्रपट आल्यावर अशोक सराफ यांनी दादांमुळे चित्रपट लोकप्रिय ठरतोय म्हणून आपण त्यांच्या चित्रपटात अडकून रहावे असे अशोक सराफना मंजूर नव्हतेच. म्हणून त्यानंतर अशोक सराफ यांनी स्क्रिप्ट आवडली नाही असे सांगून नकार दिला तरी ते दादा कोंडके यांचे ऋण मानतात. गुडघ्यापर्यंतच्या चड्डी, लोंबणारी नाडी, त्यावर हाफ हाताचा कुर्ता, केसांचा पैलवान कट, बारीक मिशी असणाऱ्या दादा कोंडके यांनी अनेक सिनेमांमध्ये दमदार भूमिका साकारत चाहत्यांच्या मनावर राज्य केलं. दादा कोंडके आज आपल्यात नाहीत, पण त्यांच्या विनोदी आठवणी आजही चाहत्यांना पोट धरुन हसण्यास भाग पाडतात. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार, तुमचं आमचं जमलं आणि रामराम गंगाराम या तीन चित्रपटात अशोक सराफची भूमिका असून ही त्या काळातील एक लोकप्रिय जोडी आहे. दादा कोंडके यांच्या विनोदाचा वारसा काही प्रमाणात पुढे समर्थपणे पेलला तो सर्वांचे लाडके अभिनेते सराफ यांनी. दादा कोंडके यांनी अशोक सराफ यांना एक गुरुमंत्र दिला होता. दादा कोंडके यांनी दिलेला गुरुमंत्र आजही अशोक मामा विसरु शकले नाहीत. दादांचा विनोद कधीच ओढून ताणून नव्हता तर त्यामध्ये एक उत्स्फूर्तता होती. विनोदातील निखळता आणि विनोदी संवादातील उत्स्फूर्तता कशी आणायची हे मी दादांकडे पाहून शिकलो. दादांनी जणू मला हा गुरूमंत्रच दिला होता. दादांच्या विनोदातील सहजता लोकांना इतकी भावली की दादांचा सिनेमा म्हणजे ज्युबिली स्टार हे समीकरणच झालं.' पुढे अशोक सराफ म्हणाले, 'दादांमध्ये खूप टॅलंट होतं. दादा पडद्यावरच नव्हे तर व्यक्तीगत आयुष्यातही हजरजबाबी होते. बोलताना त्यांना सहज विनोद सुचायचे. मला त्यांच्यातील आवडणारी गोष्ट म्हणजे त्यांनी बहुतांश सिनेमे विनोदी ढंगातील करूनही त्यांचा विनोद प्रत्येक वेळी नवीनच वाटला,' असंदेखील अशोक मामा म्हणाले. शरद तळवलकर व दादा कोंडके हीदेखील एक मराठी चित्रपटाच्या पडद्यावर जमलेली जोडी. ही जोडी जमली, दादा कोंडके निर्मित व अभिनित आणि गोविंद कुलकर्णी दिग्दर्शित "एकटा जीव सदाशिव" या चित्रपटापासून. या चित्रपटात शरद तळवलकर हे दादांच्या डॅडींच्या (खरंतर पित्याच्या) भूमिकेत होते. चित्रपटात दादा ग्रामीण नायक तर शरद तळवलकर शहरातील पिता. म्हणून दादा त्यांना आपलं सारखं डॅडी, डॅडी म्हणत.

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

# ज्ञानयज्ञाची १०७ वर्षे : रयतेचा वटवृक्ष बहरतोय

“रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे, वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे...” कवी विठ्ठल वाघ यांच्या या काव्यपंक्ती रयत शिक्षण संस्थेच्या आजवरच्या शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीचे यथार्थ वर्णन करतात. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील वंचित, उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करून सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. शिक्षणापासून पिढ्यान्‌पिढ्या वंचित राहिलेल्या समाजाला अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून स्वाभिमानाने जगण्याची नवी दिशा देण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण आणि देहाचा कण न् कण चंदनाप्रमाणे झिजविला. म्हणूनच ज्ञानोपासक कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात अत्यंत आदराने घेतले जाते.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी तेराव्या शतकात महाराष्ट्राच्या ज्ञानपरंपरेला दिलेले योगदान जितके महान, तितकेच विसाव्या शतकात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत दिलेले योगदान मोलाचे आहे. त्यांच्या विचारांचा आणि कृतीचा वारसा जपत रयत शिक्षण संस्था आज १०७ वा वर्धापन दिन साजरा करीत असून गेल्या दशकांतील या ज्ञानयज्ञाची ज्योत अधिक व्यापक आणि तेजस्वी होत आहे. “सर्वसामान्य जनतेला, दिला जगण्याचा आधार, स्थापून रयत शिक्षण संस्था, केला बहुजनांचा उद्धार.” महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून सामाजिक, शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेऊन पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रात एक शैक्षणिक चळवळ उभी केली. बहुजन समाज तसेच सर्वसामान्य मुलांसाठी शिक्षणाची कवाडे खुली केली. वसतिगृहयुक्त शिक्षणाची व्यवस्था करून अठरापगड जातींच्या मुलांना सहजीवनाचा मंत्र दिला. देशाभिमान, देशकल्याण, देशभक्तीसाठी एका समर्पित साधूत्वाचा जन्म होता तो. आपल्या देशबांधवांना सुसंस्कृत, कार्यक्षम, स्वाभिमानी, स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी त्यांनी “कमवा आणि शिका” ही योजना राबविली.



रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीमध्ये त्यांच्या धर्मपत्नी त्यागमूर्ती लक्ष्मीबाई पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था ही निव्वळ शिक्षण देणारी संस्था उभी केली असे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची एक प्रयोगशाळाच उभी केली. कराडजवळील काले या ठिकाणी सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. महाराष्ट्रातील सर्व भागांतील प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. ही परिषद ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर घेण्यात आली. पुण्याचे वकील केशवराव बागडे अध्यक्षस्थानी होते. भाऊराव बोलण्यास उठले. “केवळ भाषणाने आणि परिषदांनी आपला बहुजन समाज सुधारेल असे मला वाटत नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शिक्षणसंस्था स्थापन करणे गरजेचे आहे.” ही सूचना सर्व परिषदेत पसंत पडली, सर्वांनी मान्य केली.

भाऊरावांनी त्या शिक्षणसंस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव दिले. स्वतः कष्ट करून शेती पिकविणाऱ्या कष्टकऱ्याला रयत म्हणत. महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रिय प्रजेला रयत म्हणत. त्या दिवसापासून काले या ठिकाणी वसतिगृह सुरू करून एका विद्यार्थ्यापासून रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला प्रत्यक्षात सुरुवात केली. आज रयत शिक्षण संस्थेचा १०७वा वर्धापन दिन आहे.“शेतकरी, गरीब, सामान्य जनतेसाठी ज्ञानदीप लावला, रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेने इतिहास घडविला.”कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत रयत शिक्षण संस्थेने आज महाराष्ट्रातील १५ आणि कर्नाटक राज्यातील १ अशा एकूण १६ जिल्ह्यांमध्ये आपल्या शैक्षणिक कार्याचा विस्तार केला आहे.

जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात कर्मवीरांची विचारधारा आबाधित ठेवत संस्थेने आपल्या शैक्षणिक धोरणात काळानुरूप सकारात्मक बदल केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांच्या दूरदृष्टीतून विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान, कौशल्ये आणि विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तंत्रज्ञानाधारित शिक्षण, रयत ऑलिंपियाड, गुरुकुल प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान, रयत विज्ञान परिषद, इनोव्हेशन, इन्व्हेंशन व इन्क्युबेशन सेंटर, अटल टिंकरिंग लॅब, डिजिटल बोर्ड, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तसेच विविध स्पर्धा परीक्षा व उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

एकेकाळी कर्मवीरांनी लावलेल्या छोट्याशा रोपट्याचे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. भाऊराव आज आपल्यात नसले तरी त्यांनी प्रज्वलित केलेला ज्ञानयज्ञ आजही अखंडपणे सुरू आहे. रयतेच्या असंख्य विद्यार्थ्यांच्या यशातून आणि ज्ञानाच्या प्रकाशातून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे जात आहे. जोपर्यंत सूर्य आणि चंद्राचे अस्तित्व आहे, तोपर्यंत कर्मवीरांनी प्रज्वलित केलेली शिक्षणाची ही ज्योत अशीच तेवत राहील.

**–पाटील एच.एन.**
**(उपशिक्षक)**
तु. ह. वाजेकर विद्यालय, फुंडे

# नागोठणेकरांना मिळणार शुद्ध पाणी

## खासदार सुनील तटकरे यांचा पुढाकार

**नागोठणे : प्रतिनिधी**

१९८९ नंतर नागोठणे परिसरात रिलायन्स प्रकल्पासह विविध औद्योगिक प्रकल्प आल्याने नागोठणे गावाचा झपाट्याने विकास झाला. त्याचबरोबर नागोठणेची लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन नागोठणेकरांना शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी भारत निर्माण योजनेच्या माध्यमातून तत्कालीन रायगड जिल्हा पालकमंत्री सुनील तटकरे यांच्या माध्यमातून शुद्ध पाणीपुरवठा योजना निर्माण करण्यात आली. मात्र विविध कारणांमुळे ही योजना अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकलेली नाही.नागोठणेकरांच्या जिव्हाळ्याचा विषय बनलेल्या शुद्ध पाणीपुरवठा योजनेला गती देण्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पुढाकार घेतला आहे.

योजनेतील त्रुटी दूर करून ती कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यासाठी खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन यांच्यासमवेत मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून या



बैठकीत योजनेतील त्रुटी, आवश्यक दुरुस्ती आणि निधीची उपलब्धता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी बैठकीत सांगितले.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते किशोरभाई जैन, भाईसाहेब टके, जिल्हा परिषद सदस्य सुमित काते, रोहा पंचायत समिती सदस्या समृद्धी कोळी, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, माजी सरपंच विलास चौलकर, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, ग्रामपंचायत सदस्य तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महसूल विभाग, महावितरण, महापारेषण व एमआयडीसीचे अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, बैठकीपूर्वी खासदार सुनील तटकरे यांनी नागोठणे येथील फिल्टर प्लॅंटला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून योजनेची सद्यस्थिती, पाणी प्रक्रिया यंत्रणा, आवश्यक दुरुस्ती तसेच अडचणींची माहिती त्यांनी जाणून घेतली. योजनेतील त्रुटी दूर करून नागोठणेकरांना शुद्ध पाणी मिळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यानंतर नागोठणे ग्रामपंचायतीच्या सभागृहात शुद्ध पाणीपुरवठा योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत खासदार तटकरे यांनी ग्रामस्थांना योजनेची पार्श्वभूमी व सद्यस्थितीची विस्तृत माहिती दिली. नागोठणेकरांना शुद्ध पाणी मिळणे हा जिव्हाळ्याचा विषय आहे. दीर्घकाळ रेंगाळलेली ही योजना लवकरच कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. आपण केवळ बैठकीचा फार्स करीत नसून, योजनेतील त्रुटी दूर करून ती प्रत्यक्षात सुरू करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार आहोत, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

बैठकीदरम्यान जिल्हा परिषद सदस्य सुमित काते यांनी नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजनेसाठी जलजीवन मिशन अंतर्गत प्राप्त झालेल्या सुमारे साडेचार कोटी रुपयांच्या निधीतून नेमकी कोणती कामे करण्यात आली, याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावी, अशी मागणी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे केली.यावर खासदार तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जलजीवन मिशन अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून करण्यात आलेल्या सर्व कामांची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. नागोठणेकरांच्या शुद्ध पाण्याच्या प्रश्नाला आता खासदार सुनील तटकरे यांनी गांभीर्याने हात घातल्याने रखडलेल्या शुद्ध पाणीपुरवठा योजनेला गती मिळण्याची अपेक्षा नागोठणेकरांकडून व्यक्त होत आहे.

# मोहोपाडा-एनआयएसएम-सेबी रस्त्यावर मद्यप्राशन करणाऱ्यांचा उपद्रव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील एनआयएसएम-सेबी रस्त्यावर रात्री आठनंतर काही तरुणांकडून भररस्त्यावर मद्यप्राशन केले जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या महिला व नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचे सांगण्यात येत आहे. या मार्गावर रात्रीच्या वेळी काही जण मद्यप्राशन करून रस्त्याच्या कडेला तसेच सार्वजनिक ठिकाणी बसत असल्याचे निदर्शनास येत आहे.



त्यामुळे कामानिमित्त किंवा इतर कारणांसाठी सायंकाळनंतर या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या महिलांना असुरक्षित वाटत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विभागीय अध्यक्ष हरेश उतेकर यांनी पोलिसांकडे या प्रकाराची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. मोहोपाडा-एनआयएसएम-सेबी रस्त्यावर सायंकाळी सातनंतर नियमित पोलीस गस्त वाढवावी, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी उतेकर यांनी केली आहे.

सायंकाळनंतर महिला व नागरिक ये-जा करतात. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांमुळे अडचणींचा सामना करावा लागत असल्याने पोलिसांनी नियमित गस्त घालून नियंत्रण ठेवावे, अशी मागणी स्थानिकांकडूनही होत आहे. याबाबत नागरिकांकडून व्हिडिओच्या माध्यमातूनही तक्रारी येत असून पोलिसांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिया हिलम प्रथम

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत माणगाव येथे झालेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ३ ते ५ या गटात वावेदिवाळी केंद्रातील रायगड जिल्हा परिषद निळज आदिवासी वाडी शाळेची विद्यार्थिनी जिया जयवंत हिलम हिने प्रथम क्रमांक पटकावला. यापूर्वी झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळवून ती तालुकास्तरावर सहभागी झाली होती. माझ्या स्वप्नातील विकसित भारत या विषयावर तिने आपले विचार प्रभावीपणे मांडले. तिच्या वक्तृत्वाने उपस्थित सर्व शिक्षक, विद्यार्थी, पदाधिकारी व अधिकारी थक्क झाले. निळज आदिवासी वाडी या ग्रामीण भागातील एका आदिवासी विद्यार्थिनीने आपल्या वक्तृत्वातून मांडलेला विकसित भारत सर्वांना भारावून गेला.

# वकील केदार गांधी यांना एलएलएम पदवी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील प्रसिद्ध वकील ॲड. केदार गांधी यांनी एलएलएम पदवी नुकतीच संपादन केली असून त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. ॲड. केदार गांधी हे माणगावमधील ज्येष्ठ वकील स्व. जयंत गांधी यांचे सुपुत्र आहेत. स्व. जयंत गांधी हे निष्णात व अभ्यासू वकील म्हणून संपूर्ण माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध होते. त्यांचे सुपुत्र ॲड. केदार गांधी यांनी सन २००५ मध्ये सिम्बायोसिस कॉलेज, पुणे येथून एलएलबी ही वकिलीची पदवी संपादन केली.

तेव्हापासून आजपर्यंत २१ वर्षे केदार गांधी हे माणगाव दिवाणी व फौजदारी न्यायालयात वकिली करीत आहेत. क्रिमिनॉलॉजी यामध्ये केदार गांधी हे निष्णात आहेत. एलएलबी पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी माणगावच्या अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयातून दोन वर्षांचा एलएलएम पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण करून जुलै २०२६ मध्ये एलएलएमची परीक्षा देऊन ते उत्तीर्ण झाले आणि त्यांनी एलएलएम ही पदवी संपादन केली आहे.

अभ्यासू वकील म्हणून ॲड. केदार गांधी यांच्याकडे पाहिले जाते. पदवी संपादन केल्याने माणगाव वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मोहन मेथा, सहकारी वकील मित्र, माणगाव व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष विक्रांत गांधी, उपाध्यक्ष प्रसाद धारिया, सचिन देसाई, युवानेते सिद्धांत देसाई, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व सभासद, सगेसोयरे, मित्रमंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# पीक नोंदणीत तांत्रिक अडथळे : शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

शेती कर्ज घेण्यासाठी आणि पीकविम्यासाठी ई-पीक पाहणी अहवाल आवश्यक असतो. कर्जत तालुक्यात पीक पाहणी अहवालाबाबत कोणत्याही प्रकारची नोंद ऑनलाइन होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे जाऊन आपली समस्या मांडली आहे. कर्जत तालुक्यात ई-पीक पाहणीच्या नव्या ॲपमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने शेतकऱ्यांना पीक नोंदणी करताना अडचणींचा सामना



करावा लागत आहे. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार धनंजय जाधव यांची भेट घेऊन निवेदन दिले.

यावेळी प्रदीप सुर्वे, पंढरीनाथ दाभाडे, चंद्रकांत मांडे, बच्चू शिंदे, विशाल निगुडकर, अनंत चव्हाण, बबन देशमुख, वामन भोईर, भरत देशेकर, रघुनाथ रुठे, विठ्ठल देशमुख, रतन घारे, लक्ष्मण हिंदोळा आदी शेतकरी उपस्थित होते. अनेक शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीबाबत आक्रमक भूमिका घेतली आहे.शेतकऱ्यांना गट क्रमांकाच्या नोंदीसंदर्भात अडचणी येत असून प्रत्यक्ष भातशेती करूनही सात-बारा उताऱ्यावर पीक नोंद होत नसल्याने पीकविमा व विविध शासकीय योजनांच्या लाभावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पडीत जमिनीवर वाढलेल्या गवतामुळे प्रत्यक्ष पाहणी करणे कठीण होत असून काही भागांत मोबाईल नेटवर्कची समस्याही आहे.

त्यामुळे जुन्या पद्धतीने पीक नोंदणी करावी किंवा तलाठ्यांमार्फत प्रत्यक्ष नोंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.मागील काही दिवसांपासून पावसाअभावी काही भागातील जमिनींना भेगा पडल्याने कर्जत तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या धर्तीवर अनुदान द्यावे, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.

# माथेरानमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर



**माथेरान : बातमीदार**

हार्मनी फाऊंडेशन आणि रायगड हॉस्पिटल रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित मोफत आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचीही आरोग्य तपासणी करण्यात आली. हार्मनी फाऊंडेशनचे हे १७५ वे मोफत आरोग्य शिबिर होते. माथेरान नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेच्या प्रांगणात या भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये शालेय विद्यार्थी तसेच पालकांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधे देण्यात आली. तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. सुनील साळुंके यांनी कान, नाक, घसा तसेच जनरल तपासणी करून औषधे दिली. संस्थेचे संचालक नितीन कांदळगावकर, नम्रता नितीन कांदळगावकर तसेच भाजप शहर उपाध्यक्ष सुभाष अर्जुन भोसले यांच्या पुढाकारातून या भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या मोफत आरोग्य शिबिराला माथेरान भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस तथा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष राजेश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव यांची विशेष उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक लक्ष्मण ढेबे आदींचे सहकार्य लाभले.

# लायन्स नागोठणेच्या सेवा सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ

**नागोठणे : प्रतिनिधी**

लायन्स क्लब नागोठणेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सेवा सप्ताह अभियानाचा शुभारंभ १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी नागोठणे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उत्साहात करण्यात आला. नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच पुतळ्याच्या पायथ्याशी श्रीफळ वाढवून सेवा सप्ताहाचे अध्यक्ष लायन विलास चौलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.



लायन्स क्लबच्या वतीने १ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत विविध समाजोपयोगी व जनसेवेचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये घरातील अनावश्यक इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे संकलन करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे, पर्यावरण स्वच्छता मोहीम, चाईल्ड कॅन्सर अवेअरनेस, मधुमेह तपासणी, सायबर क्राईमविषयी मार्गदर्शन, नागोठणे शहर जनजागृती रॅली, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच अन्नदान आदी विविध लोकहितकारी उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांची माहिती लायन्स क्लबचे सचिव लायन डॉ. अनिल गिते यांनी उपस्थितांना दिली.

लायन्स क्लबच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करताना सपोनि रविंद्र पारखे यांनी क्लबच्या विविध सेवाकार्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी लायन्स क्लब अध्यक्ष लायन विलास चौलकर, लायन प्रकाश जैन, लायन यशवंत चित्रे, लायन डॉ. अनिल गिते, लायन विवेक सुभेकर, लायन विजय शहासने, लायन दौलतराम मोदी, लायन सखाराम ताडकर, लायन दीपक गायकवाड, लायन सिद्धेश काळे, लायन अतुल काळे, लायन ॲड. महेंद्र धामणे, लायन अमित मोदी, लायन रतन हेंडे, लायन सुजाता जवके, लायन विद्या म्हात्रे, लायन दीपक लोणारी, लायन विवेक करडे तसेच कोलाड लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन शाम लोखंडे, माजी अध्यक्ष लायन रविंद्र लोखंडे, लायन दिलीप मोहिते यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# रसायनीत 'स्वच्छता ही सेवा'तून स्वच्छतेचा संदेश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने रिलायन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, पाताळगंगा यांच्यावतीने 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत रसायनी-पाताळगंगा परिसरात स्वच्छता व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा एक भाग म्हणून शुक्रवार दि. २ ऑक्टोबर रोजी मोहोपाडा येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अधिकारी, वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांनी एकत्रितपणे रस्ते तसेच परिसराची स्वच्छता केली. यावेळी मोठ्या प्रमाणात कचरा संकलित करून तो पिशव्यांमध्ये भरून घंटागाडीत जमा करण्यात आला. संकलित करण्यात आलेल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.यावेळी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगाचे प्रेसिडेंट सुंदर राजन रंगराजन व पंकज यादव आदी उपस्थित होते.




MAHAVITARAN

## Tender Notice

Following Tender is invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Sub-division | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BILLING/EE/GRN/Goregaon/T-10/09-2026 | Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clusters having below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than **Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.)** to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises | Goregaon | 17,980/- | 1000+ 18% GST = 1180/- |
| 2 | BILLING/EE/GRN/Mahad/T-11/09-2026 | | Mahad | 67,320/- | 5000+ 18% GST = 5900/- |
| 3 | BILLING/EE/GRN/Mhasala/T-12/09-2026 | | Mhasala | 24,330/- | 2500+ 18% GST = 2950/- |
| 4 | BILLING/EE/GRN/Poladpur/T-13/09-2026 | | Poladpur | 18,830/- | 1000+ 18% GST = 1180/- |
| 5 | BILLING/EE/GRN/Shriwardhan/T-14/09-2026 | | Shriward-han | 33,560/- | 2500+ 18% GST = 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in & can be downloaded from Dt. 04.10.2026 to Dt. 13.10.2026. Contact Person- Dy. Executive Engineer Mob no – 9029145594, MSEDCL Ltd., Chinchvali, Goregaon, Tal:Mangaon, Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer**
**Goregaon Division**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे बार्णे, तालुका - कर्जत, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४२/२/ब | ०-८६-०० पैकी ०-५६-७० + पो.ख. ०-०१-३० **एकूण ०-५८-००** | २.३२ | कल्पना राजेंद्र बोडके |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ३/१०/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

# ज्येष्ठ नागरिकांसाठी 'ऑन कॉल' सुविधा चालू करणार -आयुक्त डॉ. कैलास शिंदे



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरातील ज्येष्ठ नागरिकांना गरजेच्या वेळी तत्काळ मदत मिळावी यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून 'ऑन कॉल' सुविधा निर्माण करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी वाशी येथे केले. मानव विकास ट्रस्ट महाराष्ट्रचा चौथा वर्धापन दिन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

शिंदे पुढे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांसाठी महापालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. महापालिकेच्या उद्यानांमध्ये विरंगुळा केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. भविष्यात गरजेनुसार या केंद्रांची संख्या वाढवण्यात येईल. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र वैद्यकीय सुविधा चालू करण्यात येणार आहे. अंथरुणावर असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना "ऑन कॉल" सुविधा चालू करणार असून त्यासाठी अत्याधुनिक दोन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्लास्टिकमुक्त महाराष्ट्राचा संकल्प करण्यात आला.

मानव विकास ट्रस्टच्या कापडी पिशवी उपक्रमाचा शुभारंभही आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. समाजातील निराधार महिला, वृद्ध आणि अनाथांसाठी एकाच ठिकाणी स्वतंत्र आश्रम उभारण्याचा मानव विकास ट्रस्टचा 'आनंदाश्रम' हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

मानव विकास ट्रस्टच्या 'आनंदाश्रम' प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने प्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर यांच्या प्रमुख भूमिकेतील 'भूमिका' या नाटकाचा विशेष प्रयोग आयोजित करण्यात आला होता.

निराधार महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अनाथांसाठी एकाच परिसरात स्वतंत्र निवास व आधारव्यवस्था निर्माण करण्याचा 'आनंदाश्रम' प्रकल्प ट्रस्टच्या वतीने हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला समाजातील विविध घटकांनी सहकार्य केल्यास तो लवकर प्रत्यक्षात येऊ शकतो, असे आयुक्तांनी सांगितले. या वेळी मानव विकास ट्रस्टच्या वतीने दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीकडे १ लाख ११ हजार १११ रुपयांचा धनादेश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव विकास महाडिक यांनी केले.या वेळी सिडकोचे महाव्यवस्थापक वेणुगोपाल नायर,अधिकारी विशाल ढगे,नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड उपस्थित होते.

# नेरुळ येथे 'नमो सेवा' पथनाट्य आणि स्वच्छता मोहीम उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी–**

भारतीय जनता पार्टी , नवी मुंबई जिल्हा यांच्या माध्यमातून भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांच्या वतीने शुक्रवारी सेवा संकल्प अभियान अंतर्गत सहकार बाजार, सारसोळे बस डेपोच्या बाजूला, नेरुळ येथे "नमो सेवा" पथनाट्य कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला।



यावेळी पथनाट्यद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी काय केले याची माहिती देण्यात आली. तसेच नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेज येथे स्वचछता अभियान अंतर्गत साफसफाई करण्यात आली. या कार्यक्रमादरम्यान राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन देखील करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियान अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आले.या प्रसंगी भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील, प्राचार्या . भाग्यश्री चौधरी, माजी नगरसेविका. शिल्पा कांबळी,राजेश सोंडकर, निनाद होनराव, नरेश भोईर, नरेश सुतार, राजेश पुजारी, शशी नेगी, शालेय शिक्षक, विद्यार्थी तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरातमधील व देशामधील गेल्या २५ वर्षांतील कारकिर्दीचा आदर झाला पाहिजे, त्यासाठी आमच्या राष्ट्रीय नेतृत्वाने देशभरात सेवा संकल्प अभियान राबवण्याची संकल्पना पुढे आणली आहे. त्याच अनुषंगाने नवी मुंबईत पथनाट्य सुरू केलेलं आहे. गेली ७० वर्षे असलेल्या सरकारला जे करता आलं नाही ते पंतप्रधान मोदी यांनी केलं आहे. १४० कोटी जनतेला केंद्रबिंदू मानून ज्या ज्या गोष्टी नरेंद्र मोदी यांनी केल्या आहे, त्याचा सन्मान केलाच पाहिजे,अभिमान बाळगलाच पाहिजे, त्यासाठी सेवा संकल्प अभियान सुरू आहे.

# औषधनिर्माण विश्लेषण, संशोधन आणि गुणवत्ता नियंत्रण कार्यशाळा

**नवीन पनवेल :** श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल यांनी एपीटीआयच्या सहकार्याने आणि बी. व्ही. पटेल एज्युकेशन फाउंडेशनच्या सहयोगाने आरपी-एचपीएलसी आणि यूव्ही स्पेक्ट्रोस्कोपी वापरून विश्लेषणात्मक पद्धत विकास आणि प्रमाणीकरणाचा प्रात्यक्षिक दृष्टिकोन या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबरला केले होते.




या कार्यशाळेचा मुख्य उद्देश औषधनिर्माण विश्लेषण, संशोधन आणि गुणवत्ता नियंत्रणातील उपयोगावर विशेष भर देत, आरपी-एचपीएलसी आणि यूव्ही स्पेक्ट्रोस्कोपीद्वारे विश्लेषणात्मक पद्धत विकास व प्रमाणीकरण याबाबत प्रात्यक्षिक ज्ञान व प्रत्यक्ष प्रशिक्षण प्रदान करणे हा होता. हा कार्यक्रम श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ. आशिष जैन यांनी आयोजित केला होता. या आयोजनास एपीटीआय महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. राकेश सोमाणी, एपीटीआयचे सचिव डॉ. विवेककुमार के. रेडसानी आणि बी. व्ही. पी. ई. एफ. च्या डॉ. नीता श्रीवास्तव यांचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे अध्यक्ष धनराज विसपुते, सचिव संगीता विसपुते आणि बी. व्ही. पटेल एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक डॉ. एस. पी. अढेसरा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.या कार्यक्रमाचे यशस्वी समन्वय डॉ. सुनीता गागरे, निकिता रोकडे आणि कु. स्नेहा सिरसाट यांनी केले. ही कार्यशाळा सहभागींचे प्रात्यक्षिक कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि औषधनिर्माण संशोधन व गुणवत्ता नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या आधुनिक विश्लेषणात्मक तंत्रांची समज वाढविण्यासाठी एक मौल्यवान व्यासपीठ ठरली.

# वाजेकर विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती

**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर प्रा. किशोर पाटील यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दोन्ही महापुरुषांचे विचार, मूल्ये आणि आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी प्राचार्य बबन साळुंखे यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांबरोबरच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी विद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरेश पाटील यांनी केले. यावेळी उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका सुप्रिया पाटील, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेलच्या गुलाब बागवानची 'कॅम्पस से संसद' उपक्रमासाठी निवड

**पनवेल : वार्ताहर**

शिवाजीनगर, पनवेल येथील गुलाब हुसेन बागवान याची 'कॅम्पस से संसद' या राष्ट्रीय उपक्रमासाठी महाराष्ट्रातून निवड झाली आहे. गुलाब हा रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एम.ए. प्रथम वर्ष (अर्थशास्त्र) या वर्गात शिक्षण घेत आहे.



या उपक्रमांतर्गत गुलाब बागवान याने नवी दिल्लीतील संसद भवन आणि राष्ट्रपती भवनाला भेट देत देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. पनवेलच्या शिवाजीनगरमधून दिल्लीच्या संसद भवनापर्यंतचा त्याचा हा प्रवास शहरासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.

राज्यसभा खासदार विनोद तावडे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संसद, लोकशाही व्यवस्था आणि संसदीय प्रक्रियेची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची संधी मिळत आहे.गुलाब बागवान याच्या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर तसेच शिक्षकवृंदांनी त्याचे अभिनंदन केले.

गुलाब बागवान याचे सामाजिक कार्यही कौतुकास्पद आहे. झोपडपट्टीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना सुशिक्षित आणि जबाबदार नागरिक बनविण्यासाठी तो सातत्याने प्रयत्नशील आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना पुढे आणण्याचा त्याचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे.

# गव्हाण विद्यालयात एनएमएमएस परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने एनएमएमएस स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी ३६ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे संचवितरित करण्यात आले.



गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच विविध स्पर्धा परीक्षांची विशेष तयारीकरून घेतली जाते. गतवर्षी एनएमएमएस परीक्षेत विद्यालयातील सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरलेहोते. यावर्षीही जास्तीत जास्त विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी व्हावेत, यासाठी विद्यालयाच्या वतीने विशेषप्रयत्न सुरू आहेत.विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या सहकार्याने यापूर्वी दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत स्टडी किटउपलब्ध करून देण्यात आले असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून एनएमएमएस परीक्षेसाठी ३६विद्यार्थ्यांना उपयुक्त पुस्तकांचे संच देण्यात आले.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष रोटरियन प्रसाद दीक्षित, प्रोजेक्ट डायरेक्टर रोटरियन अमर म्हात्रे, एससीटी कॉलेजचे पर्यवेक्षक संतोष चव्हाण तसेच रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, खारघर-ओवे पेठ येथील स्वप्नाली पवार उपस्थितहोते. .

यावेळी रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष प्रसाद दीक्षित यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे शैक्षणिकव जीवनातील महत्त्व समजावून सांगत परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रोजेक्ट डायरेक्टर अमर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांचा योग्य प्रकारे उपयोग करून यश संपादन करण्याचे आवाहन केले. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच एनएमएमएस विभागप्रमुख वृषाली म्हात्रे, पालक वर्ग आणि परीक्षेलाबसलेले विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले. विद्यालयाकडून एनएमएमएस परीक्षेसाठी सुरू असलेल्या विशेष तयारीची माहिती देत विद्यार्थ्यांनी व पालकांनी या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन परीक्षेची जिद्दीने तयारी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात स्वच्छता दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत श्रीमती.भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथे गांधी जयंती व स्वच्छता दिनानिमित्त विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.इयत्ता ६ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी बेस्ट आउट ऑफ वेस्ट आणि पोस्टर मेकिंग अशा स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॅव्हल बॅग हे आकर्षक बक्षीस देण्यात आले.

यावेळी सुशांत पाटील ,मिलिंद रसम. चंद्रकांत घरत चेअरमन श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय संतोष चव्हाण एजुकेशन इन्स्पेक्टर, माधुरी प्रभू – माजी प्राचार्या, करंजा इंग्लिश मिडीयम स्कूल,अनुराधा काठे, मुख्याध्यापिका भागुबाई चांगु ठाकूर विद्यालय आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता विषयावर आधारित नाटिका, भाषण आणि कविता वाचन सादर केले. तसेच बनवलेल्या पोस्टर्ससह शाळेच्या परिसरात स्वच्छता जनजागृती रॅलीकाढण्यात आली.शाळेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले शेवटी BPCL टीमने शाळेच्या सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी ,आणि विद्यालयच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांचे आभार मानले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




# कर्नाळा खिंडीत ट्रकमधून लोखंडी पाईप कोसळले; मोठा अनर्थ टळला

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा खिंड परिसरात शुक्रवारी (दि. २) सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास ट्रकचे नियंत्रण सुटल्याने मोठी दुर्घटना होता होता टळली. गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकची संरक्षण कठड्याला धडक बसल्यानंतर ट्रक पुन्हा मुंबईच्या दिशेने वळला. यावेळी ट्रकमधील मोठ्या प्रमाणावरील लोखंडी पाईप व इतर साहित्य रस्त्यावर कोसळले.



ट्रकमध्ये लोखंडी पाईप तसेच संरक्षणासाठी वापरण्यात येणारे लोखंडी पत्रे होते. ट्रकचा तोल गेल्यानंतर हे साहित्य संरक्षण कठडे तोडून खाली कोसळले. कर्नाळा पक्षी अभयारण्याकडून महामार्गावर येणाऱ्या भुयारी मार्गाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात लोखंडी पाईप रस्त्यावर पडल्याने वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली.

शुक्रवारनिमित्त सुट्टी असल्याने या मार्गावर पर्यटकांची मोठी वर्दळ होती. मात्र, सुदैवाने अपघाताच्या वेळी लोखंडी पाईपच्या थेट आघातात कोणतेही वाहन किंवा नागरिक आले नाहीत. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

या भुयारी मार्गाच्या परिसरात अनेक रिक्षाचालक आपली वाहने उभी करतात. त्यामुळे अपघाताच्या वेळी तेथे रिक्षा किंवा प्रवासी असते, तर गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता होती. या घटनेमुळे भुयारी मार्ग परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# रसायनीत अल्पवयीन मुलगी बेपत्ता; अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**मोहोपाडा –** चांभार्ली परिसरातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता चांभार्ली परिसरातील राहत्या घरातून बेपत्ता झाली. कुटुंबीयांनी नातेवाईक, आजूबाजूचा परिसर तसेच परिचितांकडे शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पालीत अवैध पार्किंगचा विळखा

## वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली शहरातील हटाळेश्वर चौक ते गांधी चौक हा मुख्य मार्ग सध्या बेशिस्त पार्किंगच्या समस्येने त्रस्त झाला आहे. रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेतील विविध ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी केली जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी वाहने उभी करू नयेत, असे फलक लावण्यात आलेले असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

पाली बाजारपेठेत दररोज मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येत असल्याने या मार्गावर वाहनांची वर्दळ असते. आयडीसी बँकेसमोर, हटाळेश्वर चौक परिसर तसेच एकता पथ आणि खालच्या मोहोल्याकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्यांवर वाहने उभी केली जात असल्याने उपलब्ध रस्ता कमी होत आहे. परिणामी वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः बसस्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावर रस्त्याच्या कडेला वाहने उभी राहिल्याने मोठ्या वाहनांना मार्ग काढताना अडथळा निर्माण होतो. बाजारपेठेतील काही दुकानांसमोर वाहने उभी केली जात असल्याने नागरिकांच्या ये-जा करण्यासही अडचणी निर्माण होत आहेत. त्यातच रस्त्याच्या हद्दीत पुढे आलेल्या दुकानांमुळे काही ठिकाणी रस्ता आणखी अरुंद झाला असून, वाहतुकीची कोंडी वाढत आहे.

या समस्येबाबत पाली सुधागड संघर्ष समितीने अनेक वेळा आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. अवैध पार्किंग, वाहतुकीतील अडथळे आणि बाजारपेठेतील रस्त्यांची कोंडी याबाबत समितीच्या माध्यमातून वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने करण्यात आली आहेत. मात्र अद्याप या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पाली शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था निश्चित करावी. तसेच बेशिस्त पार्किंगवर कारवाई करून वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या बाबींवर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी पाली सुधागड संघर्ष समितीसह नागरिकांकडून होत आहे.आता या गंभीर समस्येकडे पाली नगरपंचायतीचे मुख्याधिकारी किशोर जेठे आणि पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे लक्ष देऊन ठोस कारवाई करतात का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मुरूड हाऊसफुल्ल पण ऐतिहासिक जंजिरा किल्ला बंद; पर्यटकांचा हिरमोड



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

सलग तीन दिवस सुटी असल्याने मुरुड राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दिघी जेट्टी, खोरा जेट्टी व राजपुरी जेट्टी वरुन शेकडो पर्यटक येतात .परंतु जंजिरा किल्ल्याची अंतर्गत स्वच्छता झाली नसल्याने ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसही खुला झाला नाही म्हणूनच न पाहता पर्यटकांना परतावे लागले यामुळे आलेल्या शेकडो पर्यटकांचा हिरमोड झाला आहे.

पुरातत्व खात्याचे बजरंग येळीकर म्हणाले की, गेली महिनाभर स्वछता सुरु आहे पुढील ४ दिवसात किल्ला पर्यटकांसाठी खुला करू परंतु ३ दिवस सुटी असल्याने पर्यटकांची संख्या खूप असल्याने पर्यटक नाराज झाले.मुरुडचा जंजिरा किल्ला पावसाळ्याची ३ महिने समुद्र खवल्याने व वादळी वारा मुळे पर्यटकांसाठी २५ मे ला बंद केला जातो साधारण १५ ऑगस्ट पर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे .मुरुडला पाऊस सुरु असल्याने जंजिरा किल्ल्यात मोठ्याप्रमाणात झाडी वाढल्याने किल्ला फिरणे पर्यटकांसाठी धोकादायक आहे .जर १५ ऑगस्ट पर्यंत किल्ला पर्यटकांसाठी खुला करायचा असेल तर पुरातत्व खात्याने १५ दिवस अगोदर किल्ला सफाईचे काम सुरु करणे अपेक्षित आहे

दरवर्षी किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यासाठी उशीर होता याचा जाब कोणीच विचारत नाही .जंजिरा किल्ल्यासाठी ९३ कोटी खर्च करून पर्यटकांसाठी खास जेटी बांधण्यात आली आहे नूतन जेटीमुळे पर्यटक जाणे सुखकर झाले आहे परंतु झाडे सफाई काम पूर्ण होणे गरजेचे आहे .मुरुड जंजिरा येथील आर्थिक विकास पूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे.

पर्यटक किल्ला पाहण्यासाठी सकाळी ७ वाजता जेटीवर हजार राहतात पण पुरातत्व खात्याचा कर्मचारी वर्ग ९ वाजता येतो त्यानंतर तिकीट मिळणार आणि किल्यात जाणार जर टिकीट देणारा कर्मचारी सकाळी ८ वाजता हजर झाला तर पर्यटकांची सोय होईल .किल्ल्यात सरपटणारे प्राणी असल्याने पर्यटकांना काहीवेळा दिसतात व भीतीचे वातावरण तयार होते ,स्वछता झाली तर किल्ल्यात फिरणे सोपे होईल.

## गीता द. तटकरे तंत्रनिकेतनमध्ये महात्मा गांधी जयंती उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या सत्य,अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छता व सामाजिक बांधिलकीची शपथ घेतली. कार्यक्रमास संस्थेतील रजिस्टार अजित तेलंगे,संस्थेचे प्राचार्य,विपुल मसाल आय टी आय चे प्राचार्य संजय हजारे,शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



# माणगाव तालुक्यातील मांजुर्णे येथे भजन प्रीमियर लीग

**माणगाव : वार्ताहर**

वारकरी संप्रदायाची थोर परंपरा व कोकणची वैशिष्ट्यपूर्ण लोकसंस्कृती जपणे तसेच ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उदात्त उद्देशाने माणगाव तालुक्यातील मांजुर्णे या गावी 'भजन प्रीमियर लीग - २०२६' या अनोख्या व भव्य भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गावकऱ्यांचा अभूतपूर्व उत्साह आणि भक्तीमय वातावरणात ही स्पर्धा अत्यंत दिमाखात पार पडली. या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात वयोवृद्धांपासून ते अगदी लहान मुलांपर्यंत सर्वच वयोगटातील ग्रामस्थांचा सक्रिय व उत्साही सहभाग पाहायला मिळाला.



आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात नवतरुण पिढीने आपली मुळे, संस्कृती आणि वारकरी धर्म पुढे चालू ठेवावा, या हेतूने ही आगळीवेगळी संकल्पना राबवण्यात आली. गावातील १६ मान्यवरांच्या पुढाकाराने एकूण ८ सुसज्ज भजन मंडळे तयार करण्यात आली होती. प्रत्येक भजन मंडळात सुमारे २० कलाकारांचा भरणा होता. स्पर्धेत मुख्य गायक, सहगायक, चकवा वादक, टाळ वादक आणि कोरस अशा अत्यंत नियोजित व सुटसुटीत रचनेमुळे प्रत्येक संघाचे सादरीकरण उपस्थितांची दाद मिळवणारे ठरले.

या स्पर्धेत गावातील 'श्री गणाधीश भजन मंडळ', 'श्री कुलस्वामिनी भजन मंडळ', 'बंधुत्व हरिनाम भजन मंडळ', 'माऊली भजन मंडळ', 'श्री गणेश भजन मंडळ', 'माऊली जिजाई भजन मंडळ', 'शिरकाई माता भजन मंडळ' आणि 'भक्तिरस भजन मंडळ' या आठ संघांनी भाग घेऊन आपल्या उत्कृष्ट गायन व वादन कौशल्याची चुणूक दाखवली.

संपूर्ण स्पर्धेचे उत्कृष्ट आणि अतिशय शिस्तबद्ध आयोजन गावातील श्री. दिनेश शिवराम रणपिसे आणि काळभैरव भजन मंडळी यांनी केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून वडगाव येथील वरिष्ठ भजनी बुवा श्री. तुकाराम लकेश्री व श्री. उदय शिंदे बुवा यांनी काम पाहिले. त्यांनी अत्यंत तटस्थपणे, अभ्यासू वृत्तीने आणि बारकाईने परीक्षण करून विजेत्यांची निवड केली.

स्पर्धेत प्रथम क्रमांकः श्री गणेश भजन मंडळ,द्वितीय क्रमांकः माऊली भजन मंडळ,तृतीय क्रमांकः शिरकाई माता भजन मंडळ यांना मिळाला. स्पर्धेच्या संपूर्ण कालावधीत मांजुर्णे गाव भक्तीच्या, तालाच्या आणि सुरांच्या रसात न्हाऊन निघाले होते. गावातील तरुणांचा आणि लहान मुलांचा भजन या पारंपरिक लोककलेतील वाढता रस व कौशल्य पाहून ग्रामस्थांनी व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# 'भारतीय ज्ञान प्रणाली, वैद्यकशास्त्र व महाराष्ट्रातील शिल्पकला : एक समग्र अभ्यास' पुस्तकाचे अनावरण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे, द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड येथील इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक दिपेश केकाणे यांनी लिहिलेल्या इतिहास विषयाचे पुस्तक 'भारतीय ज्ञान प्रणाली, वैद्यकशास्त्र व महाराष्ट्रातील शिल्पकला यांचा एक समग्र अभ्यास' या पुस्तकाचे गांधी जयंतीचे औचित्य साधून उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड येथे अनावरण करण्यात आले.



मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमावर आधारित या पुस्तकामध्ये भारतीय ज्ञान प्रणाली, वैद्यकशास्त्र तसेच महाराष्ट्रातील समृद्ध शिल्पकला परंपरेचा अभ्यासपूर्ण व समग्र आढावा घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासस्त्रातील विषयाचे सुलभ आणि व्यापक आकलन व्हावे, तसेच भारतीय ज्ञानपरंपरा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी, हा या पुस्तक लेखनामागील प्रमुख उद्देश आहे.

प्राध्यापक दिपेश केकाणे यांनी या पुस्तकामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीच्या विविध पैलूंसोबतच प्राचीन वैद्यकशास्त्राची परंपरा, त्यातील ज्ञान आणि महाराष्ट्रातील शिल्पकलेची ऐतिहासिक, कलात्मक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांचा अभ्यास मांडला आहे. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत स्वरूप असल्याने हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

पुस्तकाच्या अनावरणप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार व चेअरमन, सुधाकर नारायण शिपलकर इंग्लिश मिडीयम स्कूल, अरुण पोवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांड्ये तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य व सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

यावेळी अरुण पोवार यांनी पुस्तकाचे कौतुक करताना भारतीय ज्ञानपरंपरा, वैद्यकशास्त्र आणि महाराष्ट्राच्या शिल्पकलेचा अभ्यास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित केले.या कार्यक्रमाचे आयोजन द. ग. तटकरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व DLLE विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र आचाय तसेच DLLE विभागप्रमुख डॉ. संगीता उतेकर व दोन्ही विभागाच्या सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाची तयारी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका शाश्वती महाडिक तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका विशाखा पवार यांनी केले.

## विद्यार्थ्यांना जीवनरक्षक सीपीआरचे प्रत्यक्ष प्रशिक्षण

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

हृदयविकाराचा झटका, पाण्यात बुडणे किंवा विजेचा धक्का बसल्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या व्यक्तीचा जीव कसा वाचवायचा, याचे धडे आता शालेय विद्यार्थ्यांना मिळतात. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या लीलाबाई ठाकर्सी कॉलेज ऑफ नर्सिंग (चर्चगेट-मुंबई) यांच्या अमृतमहोत्सवी वर्षांनिमित्त कुलगुरू निधी अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील शाळांमध्ये 'समुदायाभिमुख आरोग्य जनजागृती उपक्रम' राबवला जात आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन प्रक्रियेचे (CPR) प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले.

कृत्रिम प्रतिकृतीच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना 'हँड्स ऑन' सराव करण्यात आला या उपक्रमांतर्गत बोर्ली पंचतन येथील श्री मोहनलाल सोनी विद्यालय आणि कापोली येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूलमधील इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना.प्राध्यापिका डॉ. किर्ती जामदार यांनी कृत्रिम मानवी प्रतिकृतीच्या साहाय्याने अचूक व शास्त्रीय पद्धत समजावून सांगितली.



## डीजीटी महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.महाविद्यालय, माणगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान, लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागाच्यावतीने शुक्रवार दि.२ ऑक्टोबर रोजी साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार तथा सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मीडियम स्कूलचे चेअरमन यांनी भूषविले. या कार्यक्रमात सिमरन वाडेकर,रीम गजगे, यश कोठारी या विद्यार्थ्यांनी तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ.राजेंद्र आचार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या महापुरुषांचे महान विचार आणि कार्य, त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात, देशाच्या उभारणीत व विकासासाठी दिलेल्या योगदान यावर विचार मांडले. या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून इतिहास विषयाचे प्रा. दीपेश केकाणे यांनी लिहिलेल्या 'भारतीय ज्ञान प्रणाली : वैद्यकशास्त्र' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले आणि 'एक दिन, एक घंटा, एक साथ' हे स्वच्छता अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले.

या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुस्मिता म्हामुणकर, आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभाग प्रमुख डॉ.संगीता उतेकर, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागातील सर्व सदस्य, महाविद्यालयातील इतर प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आनंद मेळावा उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिना निमित्त आंतर राष्ट्रीय दीर्घावू सेंटर इंडिया (ilci )पुणे व घरडा केमिकल कंपनी यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिक यांचा रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीने आंनद मेळाव्याचे आयोजन केले होते.



या मेळाव्याचे अध्यक्षस्थान रायगड जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर यांनी भूषविले. या आंनद मेळाव्याला पनवेल, पेण, अलिबाग, रोहा, महाड, माणगांव, कोलाड, इंदापूर गोरेगाव अशा जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या मेळाव्या साठी ज्येष्ठ नागरिक महासंघ पुणे अध्यक्ष अरुण रोडे हे आवर्जून उपस्थित होते. रोह्याच्या ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष पी. बी. सरफळे, उपाध्यक्ष एस. एन. गायकवाड, सचिव, सुरेश मोरे, अविनाश म्हात्रे, दगडू बामुगडे, मंगेश देशमुख तसेच बहुसंख्य महिला आणि पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते.

या वेळी प्रमुख अतिथी अरुण रोडे यांनी मेळाव्याला संबोधित करताना सांगितले. जगात १२ टक्के ज्येष्ठ नागरिकांची संख्या आहे. निरनिराळी उत्तम प्रकारची औषधे त्याच प्रमाणे आरोग्य विषयक उपकरणे (यंत्र सामुग्री )यामुळे दिवसेंदिवस ज्येष्ठ नागरिकांचे आयुमान वाढत चालले आहे.

## आज रोह्यात भक्त निवास नूतनीकरण व इतर कामांचे लोकार्पण

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील श्री धावीर महाराज मंदिर रोहा येथे भक्तनिवास नूतनीकरण व इतर कामांचे लोकार्पण खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते आज (४ ऑक्टो. ) रोजी होणार आहे.

यावेळी महीला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके, निता हजारे, उपसभापती गौरी बारटक्के, गट नेते महेंद्र गुजर, श्री धावीर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष एड. प्रशांत देशमुख,श्री धावीर देवस्थान उत्सव कमिटी अध्यक्ष कुमार पाशिलकर यांच्यासह नगरसेवक, रोहा अष्टमी नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व रोहा अष्टमी शहरातील नागरिक उपस्थित राहणार आहेत.

# भारताचा आशियावर झेंडा!

## अभिषेक-तिलकची तुफानी खेळी, पाक चारीमुंड्या चीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने आपला दबदबा सिद्ध करत पाकिस्तानचा १९ धावांनी दणदणीत पराभव केला. जपानमधील कोरोगी स्पोर्ट्स पार्क येथे रंगलेल्या या हाय-व्होल्टेज सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा घेतलेला निर्णय फलंदाजांनी पूर्णपणे सार्थ ठरवला. अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांच्या तुफानी अर्धशतकांच्या जोरावर भारताने ६ बाद २११ धावांचा डोंगर उभारला. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर पाकिस्तानचा हसन नवाझ एकटा पडला. त्याने ९६ धावांची धडाकेबाज खेळी केली, परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.



श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले, तर पाकिस्तानला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.पाकिस्तानविरुद्धच्या सुवर्णपदकाच्या सामन्यात भारतीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांनी आक्रमक सुरुवात केली. मात्र भारताला पहिला धक्का वैभवच्या रूपाने बसला. वैभव ९ चेंडूंमध्ये १५ धावा करून बाद झाला. त्याने दोन षटकार ठोकले. मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात त्याला विकेट गमवावी लागली. वैभव स्वस्तात बाद झाल्यानंतर अभिषेक शर्माने भारताचा डाव सावरत पाकिस्तानच्या गोलंदाजांची धुलाई केली. अभिषेकने अवघ्या २८ चेंडूंमध्ये ६१ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ७ चौकार आणि ३ षटकार होते. दरम्यान संजू सॅमसन ४ चेंडूंमध्ये २ धावा करून बाद झाला. कर्णधार श्रेयस अय्यरने २४ चेंडूंमध्ये २१ धावा केल्या, तर इशान किशनने १८ चेंडूंमध्ये २० धावांचे योगदान दिले.

भारताच्या डावाला मोठी धावसंख्या मिळवून देण्यात तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनी अखेरच्या टप्प्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिवम दुबेने १५ चेंडूंमध्ये २७ धावा ठोकल्या. त्याने २ चौकार आणि २ षटकार मारले. दुसरीकडे तिलक वर्माने नाबाद ५१ धावांची खेळी करत भारताला २०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. तिलकने अवघ्या २२ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५१ धावा केल्या. अशाप्रकारे भारताने २० षटकांत ६ गडी गमावून २११ धावा केल्या.

भारताने दिलेल्या २१२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानसाठी साहिबजादा फरहान आणि माझ सदाकत यांनी डावाची सुरुवात केली. कर्णधार फरहान १० धावांवर, तर सदाकत २३ धावांवर बाद झाला. त्यानंतर उस्मान खान ३ धावांवर बाद झाला. सॅम अयुबने संघासाठी २९ धावा केल्या, तर अब्दुल समद ९ धावांवर बाद झाला. या सामन्यात पाकिस्तानसाठी हसन नवाझने सर्वाधिक धावा केल्या.

त्याने २८ चेंडूंमध्ये ५ षटकारांसह ५० धावा पूर्ण करत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ५१ चेंडूंमध्ये ५ चौकार आणि ७ षटकारांसह ९६ धावांची धडाकेबाज खेळी केली, परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. भारतासाठी अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

# गोळाफेकीत रानू डांगीची यशस्वी कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एचओसी, रसायनी, खालापूर येथे २ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपरच्या विद्यार्थिनीने उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. इयत्ता दहावीतील रानू सोहनलाल डांगी हिने १७ वर्षांखालील मुलींच्या शॉटपुट थ्रो प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. तिच्या या यशामुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रानूच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, क्रीडा शिक्षक वामन कुऱ्हाडे व वर्षा नलावडे तसेच सर्व शिक्षकवृंदांनी तिचे



अभिनंदन करून विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.रानूच्या यशामुळे विद्यालयातील क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला नवी ओळख मिळाली असून तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# सीकेटीचे क्रीडापटू ॲथलेटिक्समध्ये चमकले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालय रोडपाली व बालभारती पब्लिक स्कूल खारघर येथे झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयातील रितेश भगत (इ.१२ वी) १०० मीटर धावणे व लांब उडी प्रथम क्रमांक, प्रिया गावंड (इ.१२वी) ३००० मीटर चालणे प्रथम क्रमांक, जतीन कनोजिया (इ.१२वी) ८०० मीटर धावणे प्रथम क्रमांक व ४०० मीटर धावणे तृतीय क्रमांक, रितेश भगत, सुयश भगत, गीतेश चौधरी, विशाल उपाध्ये ४१०० मीटर रिले प्रथम क्रमांक, ऋतुजा कोरडे (इ १२वी)- गोळाफेक प्रथम क्रमांक, चिन्मय पाटील (इ.११वी ) उंच उडी प्रथम क्रमांक व ११० मीटर अडथळ्यांची शर्यत प्रथम क्रमांक, गीतेश चौधरी (इ.१२वी) २०० मीटर धावणे द्वितीय, ४०० मीटर धावणे-द्वितीय, आदित्य अशोक शिंदे (इ.११वी) गोळाफेक-द्वितीय क्रमांक, अनिकेत रतन जाधव (इ.१२वी) तिहेरी उडी द्वितीय क्रमांक, सुदेश हरिश्चंद्र बैदु (इ वी १२) थाळीफेक द्वितीय क्रमांक, सुयश रमेश भगत (इ.१२वी)- १०० मीटर धावणे द्वितीय अशी यशाची आकडेवारी आहे.

ॲथलेटिक्स स्पर्धेमधील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय ॲथलेटिक्ससाठी निवड झाली. याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# सीकेटीच्या ओम पाटीलचे वेटलिफ्टिंगमध्ये सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुल, ठाणे येथे १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली यांच्या विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील ओम योगेश पाटील याने तृतीय क्रमांक पटकावला.

ओम ११ वी कॉमर्स वर्गात शिकत आहे. विभागीय स्पर्धेत ओमच्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कुमकुम मोहोडला ऐतिहासिक सुवर्ण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमरावतीच्या कुमकुम मोहोडने जपानमध्ये इतिहास घडवला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने महिलांच्या एकेरी रिकर्व प्रकारात दक्षिण कोरियाच्या येजिन ओहला शूट ऑफमध्ये पराभूत करून सुवर्णपदकाला गवसणी घातली. अंतिम सामन्यात तिने ६-५ ने विजय मिळवला. १९७८ नंतर भारताला या प्रकारात सुवर्णपदक जिंकता आले नव्हते. आता ४८ वर्षांनंतर कुमकुमने ही प्रतीक्षा संपवत भारताला सुवर्णपदक जिंकून दिले आहे.

अंतिम सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. दोन सेटनंतर कुमकुम ३-१ ने पिछाडीवर होती. पण त्यानंतर कुमकुमने दमदार पुनरागमन करत स्कोअर ३-३ ने बरोबरीत आणला. त्यानंतर येजिनने पुन्हा एकदा आघाडी घेतली. तिने ५-३ ने आघाडी घेतली. पाचव्या सेटमध्ये

## ४८ वर्षांची प्रतीक्षा संपली

कुमकुमने ३ परफेक्ट १० मारले आणि स्कोअर ५-५ ने बरोबरीत आणला. त्यामुळे सामन्याचा निकाल शूट ऑफमध्ये गेला. शूट ऑफमध्ये येजिनने ८ गुणांची कमाई केली, तर कुमकुमने परफेक्ट १० वर निशाणा साधला आणि भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकून दिले.

हे भारताचे या स्पर्धेतील १७वे सुवर्णपदक आहे. कुमकुमने आशियाई क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. हे तिचे या स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक आहे. याआधी तिने अंकिता भकत आणि किर्ती शर्मा यांच्यासोबत महिलांच्या रिकर्व टीम इव्हेंटमध्ये सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. यासह धीरज बोम्मदेवरा याच्यासोबत मिळून मिश्र रिकर्व प्रकारात तिने रौप्यपदकाला गवसणी घातली होती.

# चिन्मय पाटील जिल्हास्तरीय उंच उडी स्पर्धेत प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय, पुणे आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बालभारती पब्लिक स्कूल, खारघर येथे जिल्हास्तरीय १७ वर्षांखालील मुले व मुली उंच उडी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील चिन्मय सचिन पाटील याने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

चिन्मय पाटील हा ११वी सायन्स वर्गात शिकत आहे. ॲथलेटिक्स स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी चिन्मयचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# गोल्फमध्ये प्रणवी उर्सची भरारी

## भारताला सुवर्ण-रौप्य



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत शनिवारी (दि. ३) इतिहास रचला गेला. जपानमध्ये सुरू असलेल्या या २०व्या आवृत्तीत भारताने गोल्फमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली आहे. प्रणवी उर्स हिने या स्पर्धेत महिलांच्या वैयक्तिक प्रकारामध्ये हे विजेतेपद पटकावले. यामुळे ती आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला गोल्फर ठरली आहे.

२३ वर्षीय प्रणवीच्या सुवर्णपदकाने भारताची २४ वर्षांची प्रतीक्षा संपली. यापूर्वी भारतासाठी २००२ मध्ये बुसान येथे शिव कपूरने पुरुष एकेरी विजेतेपद पटकावले होते, तर महिलांमधील एकमेव पदक अदिती अशोकने २०२३च्या आवृत्तीत जिंकले होते. तेव्हा तिने रौप्यपदक पटकावले होते, तर त्या स्पर्धेत प्रणवी चौथ्या स्थानावर राहिली होती.या स्पर्धेच्या इतिहासातील भारताचे हे चौथे गोल्फमधील सुवर्णपदक ठरले. पहिले विजेतेपद १९८२ मध्ये लक्ष्मण सिंग यांनी जिंकले होते. तसेच त्यांनी पुरुष संघासोबतही विजेतेपद मिळवले होते.

मूळची म्हैसूरच्या असलेल्या प्रणवीने तिसऱ्या होलवर ट्रिपल बोगी केल्यानंतर तीन बर्डीज मारल्या. तिने अंतिम फेरीत इव्हन पार ७०चा स्कोअर नोंदवून ऐतिहासिक विजय मिळवला. तिने चार फेऱ्यांची स्पर्धा १५-अंडर २६५ गुणांसह पूर्ण केली. त्यानंतर तिने महिलांच्या सांघिक प्रकारामध्येही रौप्यपदक जिंकले. या संघात तिच्यासोबत अदिती (अंतिम फेरी ६७) आणि दीक्षा डागर (अंतिम फेरी ७७) होत्या. हे भारताचे या खेळातील महिला संघांचे पहिलेच पदक ठरले.

# प्रिटोरियसचा विश्वविक्रम; टी-२०मध्ये नाबाद १८८ धावा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या देशांतर्गत टी-२० लीगमध्ये नाबाद १८८ धावांची खेळी करत लुआन-द्रे प्रिटोरियसने इतिहास घडवला. या खेळीसह त्याने टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा जागतिक विक्रम आपल्या नावे केला. गेल्या १३ वर्षांपासून हा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर होता. गेलने २०१३ च्या आयपीएलमध्ये पुणे वॉरियर्स इंडियाविरुद्ध नाबाद १७५ धावा केल्या होत्या. आता गेलचा हा विक्रम मोडीत काढत प्रिटोरियसने टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्येचा नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

शुक्रवारी झालेल्या देशांतर्गत सीएसए टी-२० चॅलेंज सामन्यात नाईट्सविरुद्ध टायटन्सकडून खेळताना लुआन-द्रे प्रिटोरियसने ७९ चेंडूत नाबाद १८८ धावा केल्या. या खेळीदरम्यान प्रिटोरियसने १३



षटकार आणि १५ चौकार लगावले. मात्र द्विशतक हुकल्याची खंत त्याला नक्कीच वाटली असेल. जर त्याला आणखी एक षटक खेळायला मिळाले असते, तर त्याने कदाचित आणखी एक मोठा टप्पा गाठला असता. प्रिटोरियसच्या या दमदार खेळीच्या जोरावर टायटन्सने एकूण २६७ धावांचा डोंगर उभारला. हा २० वर्षीय डावखुरा फलंदाज सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने नुकत्याच नामिबिया, झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिरंगी मालिकेत ५३ चेंडूत १०१ धावांची शानदार खेळी केली होती.

प्रिटोरियसने आपल्या खेळीची सुरुवात आक्रमकपणे केली. त्याने अवघ्या २४ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर शतक गाठण्यासाठी त्याला केवळ आणखी १६ चेंडू लागले. पुढे त्याने ५८ चेंडूत १५० धावांचा टप्पा गाठला.पुरुष टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येबाबत प्रिटोरियसने ॲरॉन फिंच आणि मार्कस स्टॉइनिस यांच्या विक्रमाशी बरोबरीही केली. प्रिटोरियसच्या शानदार खेळीच्या जोरावर टायटन्सने ३ बाद २६७ धावांची मजल मारली.

सीएसए टी-२० चॅलेंजच्या इतिहासातील ही संघाची दुसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. यापूर्वी २०२२ मध्ये याच संघाविरुद्ध टायटन्सने ३ बाद २७१ धावा केल्या होत्या. त्या सामन्यात डेवाल्ड ब्रेविसने १६२ धावा केल्या होत्या, जी सीएसए टी-२० चॅलेंजमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या होती, मात्र आता तो विक्रम प्रिटोरियसच्या नावावर जमा झाला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com